
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३२३
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १० जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
मांडवा जेट्टी येथे हाणामारी; चार जण जखमी/२
माथेरानमधील हातरिक्षा चालकांचे उपोषण स्थगित/५
रोह्यातील संस्कार वारगुडेला बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक/८

## इर्शाळगड पुन्हा ढासळतोय; नेढाचा भाग कोसळला



**खोपोली** : दोन वर्षांपूर्वी घडलेली खालापुरातील इर्शाळवाडी दुर्घटना अद्याप विस्मरणात गेली नसून तेथे पर्यटकांना कायम खुणावणारा नेढाचा भाग काही दिवसांपूर्वी ढासळल्याने पुन्हा एकदा गडाने धोक्याची सूचना दिली आहे. १९ जुलै २०२३ रोजी झालेल्या दुर्घटनेत इर्शाळवाडी नकाशावरून पुसून गेली. या दुर्घटनेत शासनाकडून २७ जणांना मृत घोषित करण्यात आले, तर ५७ जणांची बेपत्ता नोंद करण्यात आली. गाडले गेलेल्या अनेकांचे मृतदेह शोधणे कठीण झाल्यामुळे शोधकार्य चौथ्या दिवशी थांबवण्यात आले होते. घटनेनंतर पर्यटक, ट्रेकर्स यांना गडाच्या वाटा बंद करण्यात आल्या आहेत, परंतु उत्सुकतेपोटी काही पर्यटक इर्शाळगडावर जात असताना त्यांना नेढाचा भाग तुटलेला दिसून आला. सुदैवाने दगड व माती दरीच्या बाजूने कोसळल्याने कोणतीही दुर्घटना घडली नसली तरी गड असुरक्षित होत असल्याचा इशारा मिळाला आहे.

# लोकलमधून पडून चार प्रवाशांचा मृत्यू

### मुंब्रा रेल्वेस्थानकाजवळ दुर्दैवी घटना



**ठाणे : प्रतिनिधी**

धावत्या लोकलमधून प्रवास करणारे सुमारे १३ जण पडल्याची घटना सोमवारी (दि. ९) मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ सकाळी ९.२०च्या सुमारास घडली. यापैकी चार जणांचा मृत्यू झाला असून नऊ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला जाणारी लोकल दिवा रेल्वेस्थानकातून सुटल्यानंतर मुंब्र्याच्या आधी ही दुर्घटना घडली. प्रचंड गर्दीमुळे अनेक प्रवासी दरवाज्यात उभे होते. त्यांच्या पाठीवर बॅग होत्या. दरम्यान, सीएसएमटीहून डाऊन दिशेने जाणारी लोकल या ट्रेनच्या बाजूने जात होती. तेव्हा दरवाजात उभे असलेले प्रवासी बाजूने जाणाऱ्या ट्रेनला घासले गेले आणि खाली पडले. मृतांमध्ये केतन दिलीप सरोज (वय २३, रा. उल्हासनगर), राहुल संतोष गुप्ता (वय २८), विकी बाबासाहेब मुख्यदल (वय ३४, रेल्वे पोलीस कर्मचारी) आणि मयूर शहा (वय ५०) यांचा समावेश आहे.

### पाच लाखांची मदत जाहीर

मुंब्रा येथील रेल्वेस्थानकाजवळ लोकलमधून पडून मृत पावलेल्या प्रवाशांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच लाखांची मदत जाहीर केली आहे, तर जखमींना ५० हजार ते दोन लाखांपर्यंतची मदत करण्यात येणार आहे. शिवाय त्यांच्या उपचाराचा खर्च शासनातर्फे करण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केली.

### दुर्गराज रायगडावर तिथीनुसार शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

# शिवसृष्टीसाठी सरकारचे सर्वतोपरी सहकार्य

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन



**महाड : प्रतिनिधी**

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५२वा राज्याभिषेक दिन सोहळा सोमवारी (दि. ९) ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत उत्साहात झाला. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. त्यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांचे गड-किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचे स्वप्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असून महाड येथील शिवसृष्टीसाठी राज्य सरकारकडून सर्व प्रकारची मदत केली जाईल, असे सांगितले.


कोकण कडा मित्र मंडळ श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव समितीच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, तर स्वागताध्यक्षपद रोहयोमंत्री भरत गोगावले यांनी भूषविले. सोहळ्यानिमित्ताने एक दिवस आधीच म्हणजे रविवारपासूनच रायगडावर शिवभक्तांची मांदियाळी जमण्यास सुरुवात झाली होते. होळीचा माळ, राज सदर या ठिकाणी मर्दानी खेळ, पोवाडे सादर करण्यात आले. गड मशाली, दिव्यांनी उजळून निघाला होता तसेच इलेक्ट्रिक लाईटच्या रंगीबिरंगी प्रकाशात गडावरील पुरातन इमारतींचे सौंदर्य खुलून दिसत होते.

राज्याभिषेकाच्या दिवशी पहाटे ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज समाधी पूजन, जगदीश्वर मंदिरातील शिवपूजन व होळीच्या माळावरील महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व शिरकाई देवीचे पूजन करून सोहळा सुरुवात झाली. या सोहळ्याला गृहराज्यमंत्री योगेश कदम, उद्योमंत्री उदय सामंत, खासदार बारणे, आमदार महेंद्र थोरवे, मंगेश चव्हाण, रूपेश म्हात्रे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, कोकण कडा मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार, कार्याध्यक्ष नितीन पोवळे, हिरोजी इंदुलकरांचे वंशज, बांदल व जेधेंचे वंशज आदी उपस्थित होते.

राजदरेवरील मेघडंबरीतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या उपस्थितीत शिवप्रतिमेला होनांचा अभिषेक करण्यात आला. महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांच्या पाण्याने जलाभिषेक करून राजपुरोहितांनी मंत्रोच्चारात अभिषेक केला. **(पान २ वर...)**



**पनवेल : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने कामोठे येथील सुभाष लक्ष्मण कांबळे आणि पनवेलमधील रमेश बाबुराव चक्रे यांना पुरस्कार जाहीर झाला असून त्यांना मंगळवारी मुंबईतील नरिमन पॉईंट येथे होणाऱ्या समारंभात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव आदी उपस्थित होते.**



**ज्योतीने तेजाची आरती...**
**रयत शिक्षण संस्थेचे ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या जयंतीनिमित्त**
**विशेष लेख**
**पान ३ वर..**

# पीओपी मूर्तींवरील बंदी उठवली

### हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय; मूर्तिकार अन् मंडळांना दिलासा



**मुंबई : प्रतिनिधी**

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मूर्ती घडवण्यावर आणि त्याची विक्री करण्यावर बंदी नसल्याची सुधारित भूमिका केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) सोमवारी उच्च न्यायालयात मांडली. तथापि, पीओपी मूर्तींच्या नैसर्गिक जलस्रोतील विसर्जनाला मनाई कायम राहील, असेही सीपीसीबीने स्पष्ट केले.

विशिष्ट परिस्थितीत पीओपीला परवानगी देणे शक्य असल्याचा दावा राज्य सरकारने मागील सुनावणीच्या उच्च न्यायालयात केला होता. वादग्रस्त मुद्द्याच्या अभ्यासासाठी नियुक्त केलेल्या समितीने केलेल्या शिफारशींचा दाखला देऊन सरकारने हा दावा केला होता तसेच समितीचा शिफारशींचा अहवाल निर्णयासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) पाठवल्याचेही न्यायालयात सांगितले. ऑगस्ट महिन्यात गणेशोत्सव असल्याच्या पार्श्वभूमीवर समितीच्या शिफारशींवर लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आदेश न्यायालयाने सीपीसीबीला दिले होते.

## निवडक

### केरळ किनाऱ्यावर जहाजात स्फोट, पाच कर्मचारी जखमी

**तिरूवनंतपूरम** : अरबी समुद्रात केरळमधील कोझिकोडच्या बेपोर किनाऱ्याजवळ सिंगापूरचा ध्वज असलेल्या एका कंटेनरवाहू जहाजात स्फोट झाला. या स्फोटात पाच क्रू मेंबर्स जखमी झाले असून चार जण बेपत्ता आहेत. या स्फोटामुळे ५० कंटेनर समुद्रात पडले असल्याचेही सांगण्यात आले. भारतीय तटरक्षक दलाकडून जखमींना तत्काळ प्रथमोपचार दिले गेले. बेपत्ता क्रू मेंबर्सचा शोध सुरू असून घटनास्थळी आवश्यक मदत पुरवली जात आहे.

### हनिमुन हॉरर : पतीच्या हत्येप्रकरणी पत्नीसह पाच जण अटकेत

**लखनऊ** : मेघालयातील शिलाँग येथे हनिमुनसाठी गेलेल्या राजा रघुवंशी आणि सोनम रघुवंशी या दाम्पत्याच्या बेपत्ता होण्याचे गूढ अखेर उकलले आहे. सोनमने मारेकऱ्यांकरवी पतीची हत्या केली असून तिला उत्तर प्रदेशमधील गाझीपूर येथून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सोनमशिवाय या कटात सामिल असलेला तिचा प्रियकर राज कुशवाह तसेच मारेकरी आनंद कुर्मी, आकाश राजपूत, विशाल उर्फ विक्की ठाकूर यांनाही बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज गौरव सर्किट प्रवास प्रेरणादायी



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उद्गार
### विशेष रेल्वेला दाखवला हिरवा झेंडा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वेची गौरव यात्रा अंतर्गत आजपासून सुरू होणारा छत्रपती शिवाजी महाराज सर्किट हा प्रवास सर्व प्रवाशांसाठी एक प्रेरणादायी अनुभव असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. ९) केले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे भारत गौरव रेल्वेच्या शुभारंभावेळी ते बोलत होते.

या वेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक विभागाचे सचिव विकास खारगे, पर्यटन प्रधान सचिव अतुल पाटणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी, भारतीय रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना, आयआरसीटीसीचे राहुल हिमालियन, महाराष्ट्र पर्यटन विभागाचे विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, वरिष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे यांच्यासह रेल्वेचे अधिकारी, प्रवासी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा आणि स्वातंत्र्य इतिहास जिवंत ठेवण्याचे काम या रेल्वेच्या माध्यमातून होणार आहे. आज या रेल्वेतून सातशेपेक्षा जात प्रवासी प्रवास करत आहेत. यातील ८० टक्के प्रवासी हे चाळीस वर्षाच्या आतील आहेत, जे आज छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पाहण्यासाठी जात आहेत. राज्यातील सर्व भागातून आलेल्या सर्व प्रवाशांना या सर्किट रेल्वेच्या माध्यमातून इतिहास अनुभवण्याची संधी मिळणार आहे. शिवराज्याभिषेकास ३५१ वर्ष पूर्ण होत आहेत. आजच्या या दिवशी ही रेल्वे सुरू होत असल्याचा आनंद आहे. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रवाशांना शुभेच्छा दिल्या तसेच या पहिल्याच सर्किट यात्रेत प्रवास करत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदनही केले.

## माणगाव स्टेशनवर शाही स्वागत; स्वराज्याची राजधानी रायगडला भेट

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन आणि भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने ऐतिहासिक, सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनगौरवाचा अनुभव देण्यासाठी भारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत प्रवासासाठी निघालेली विशेष पर्यटक रेल्वे छत्रपती शिवाजी महाराज सर्किटचे माणगाव रेल्वेस्थानकावर जल्लोषात स्वागत करण्यात आले. या सर्व पर्यटकांनी सोमवारी दुर्गराज रायगडला भेट देऊन पाहणी केली.



या विशेष रेल्वेच्या माणगाव स्थानकावर आगमनावेळी खासदार सुनील तटकरे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, माणगाव तहसीलदार दशरथ काळे, भारतीय रेल्वे पर्यटन मंडळ अधिकारी श्रीमती गुप्ता यांच्यासह रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पर्यटकांचे रेल्वेस्थानकावर रायगड जिल्हा प्रशासनाने पारंपरिक ढोल-ताशाच्या गजरात औक्षण करून स्वागत केले तसेच पर्यटकांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. पर्यटकांना दुर्गराज रायगडची पर्यटनाच्या दृष्टीने माहिती देणारी घडीपुस्तिका वाटप करण्यात आले. स्टेशनवरून एकूण १८ बसेसमधून हे सर्व पर्यटक रायगड किल्ल्यासाठी रवाना झाले. दिवसभर किल्ल्याची पाहणी केल्यानंतर सायंकाळी या विशेष रेल्वेने पुढील प्रवासासाठी त्यांनी पुण्याकडे प्रयाण केले.

## वटपौर्णिमेची खरेदी



**मुरुड : आपल्या पतीला दीर्घायुष्य प्राप्त व्हावे म्हणून महिला ज्या दिवशी वटवृक्षाची पूजा करतात ती वटपौर्णिमा मंगळवारी आहे. या पार्श्वभूमीवर पूजेचे साहित्य, फळे खरेदी करण्यासाठी आदल्या दिवशी बाजारपेठेत गर्दी दिसून आली.** (छाया : सुधीर नाझरे)

# शासन सर्वसामान्य नागरिकांच्या दारी -आमदार महेश बालदी



**चौक : प्रतिनिधी**

दाखल्यांचे शिबिर ही एक महत्त्वाची प्रक्रिया असून यातून सर्वसामान्य नागरिकांना लागणारे विविध दाखले मिळत असल्याने त्यांना एक प्रकारे सहकार्य होते. त्याचप्रमाणे यानिमित्ताने शासन सामान्यांच्या दारी जाते. त्यामुळे शिबिर आयोजकांचे अभिनंदन, असे गौरवोद्गार आमदार महेश बालदी यांनी काढले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान अंतर्गत आमदार महेश बालदी यांच्या सूचनेनुसार खालापूर कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, गटविकास अधिकारी व सर्व शासकीय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दाखल्यांसाठी चौक येथे शिबिर आयोजित करण्यात होते. त्या वेळी आमदार महेश बालदी बोलत होते.

सर्वसामान्य जनतेस तसेच विद्यार्थी यांना शैक्षणिक व अन्य शासकीय सुविधांसाठी विविध स्वरूपाच्या दाखल्यांची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने हे शिबिर झाले. या वेळी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला, रहिवास दाखला, नॉन क्रिमिलेअर दाखला, जेष्ठ नागरिक, संजय गांधी निराधार योजना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, स्थानिक वास्तव्याचा दाखला, भोगवटदार वर्ग २चे वर्ग १ करणे, ४० पट नजराणा भरणे आदी दाखल्यांसाठी कागदपत्रे भरून घेण्यात आली. ज्यांची कागदपत्रे परिपूर्ण आणि व्यवस्थित होती त्यांना आमदार महेश बालदी, तहसीलदार अभय चव्हाण यांच्या हस्ते दाखले वाटप करण्यात आले.

या शिबिरास भाजप तालुका मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, ज्येष्ठ नेते विनोद भोईर, रामदास ठोंबरे यांच्यासह निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, डॉ. कल्याणी इंगोले, कृषी विभागाचे नितीन महाडिक, पंचायत समितीच्या वर्षा हजारे, गणेश मुंडे, तलाठी अभिजित हिवरकर, माधव कावरखे, अशोक बनसोडे, अक्षय गावडे, सुदर्शन पालवे, मधुसूदन पांपटवार यांच्यासह कोतवाल उपस्थित होते.

चौक मंडळ अधिकारी माणिक सानप, वासांबे मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे नीटनेटके नियोजन करण्यात आले होते. महसूल आणि ग्रामविकास विभागातील सर्व यंत्रणा उपस्थित होती.

या वेळी अनेक गरजू, लाभार्थी यांनी या शिबिराचा लाभ घेतला तसेच आर्थिक व वेळेची बचत झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश कदम, गिरीश जोशी, मुकादम यांनी विशेष प्रयत्न केले.

# ‘बंदरांच्या ठिकाणी सुरू असलेली कामे गती व पारदर्शकतने पूर्ण करा’

**मुंबई : प्रतिनिधी**



कारंजा, आनंदवाडी, मिरकरवाडा व ससून डॉक येथील बंदरे ही कोकणाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असून यातून तेथील लोकांच्या आर्थिक विकासास चालना मिळेल. या बंदरांच्या ठिकाणी सुरू असलेली विकासकामे गती व पारदर्शकतेने पूर्ण करा, अशा सूचना मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाची आढावा बैठक मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीला विभागाचे आयुक्त किशोर तावडे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश पाठक, उपसचिव श्री. जकाते, सह आयुक्त दिनेश देवरे, प्रादेशिक उपायुक्त प्रकाश भादुले यासह विभाग व महामंडळातील अधिकारी उपस्थित होते.

मंत्री राणे यांनी महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाच्यावतीने सुरू असलेल्या बंदरांचा विकास व आधुनिकीकरणाच्या कामांचा आढावा घेतला. यामध्ये मुंबई शहरातील ससून डॉक, रायगड जिल्ह्यातील कारंजा (उरण), सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आनंदवाडी व रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा येथील बंदरांच्या विकासकामांची माहिती घेतली.येथील बंदरांच्या ठिकाणी मासे लिलाव शेड, बर्फ कारखाना, वर्कशॉप, मासेमारीच्या जाळ्यांची दुरुस्ती व निगा राखण्यासाठी शेड, प्रसाधनगृह यांसह विविध काम केली जात आहेत. सध्या सुरू असलेल्या कामांसाठी ससून गोदी मच्छीमार बंदर येथील विकास कामांसाठी ९२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, आनंदवाडी येथील विकासकामांसाठी ८८ कोटी ४४ लाख रुपये, मिरकरवाडा येथील विकासकामांसाठी २६ कोटी २३ लक्ष रुपये, कारंजा येथील विकासकामांसाठी १४९ कोटी ८० लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कोकणातील सात ठिकाणी होत असलेल्या मासे उतरवणी केंद्रातील कामांचा देखील यावेळी आढावा घेण्यात आला. महाराष्ट्र सागरी मच्छिमार कल्याणकारी महामंडळ आणि महाराष्ट्र भूजलाशय मच्छीमार कल्याणकारी महामंडळ यांची घोषणा राज्य शासनाने ऑक्टोबर २०२४ मध्ये केली आहे. यासाठी मुंबई व नागपूर येथील कार्यालयातील सध्याच्या कार्यरत यंत्रणेमार्फत काम केले जावे. या दोन्ही महामंडळाचे कामकाज तातडीने सुरू होण्यासाठी विभागाने कार्यवाही करावी, असे आदेशही मंत्री राणे यांनी यावेळी दिले.

# कुशल मनुष्यबळ हेच महानिर्मितीचे बलस्थान –राधाकृष्णन




**मुंबई : प्रतिनिधी**

गतकाळातील कार्याचा आढावा घेत नवे संकल्प करण्याचा आजचा दिवस असून राज्याच्या भविष्यातील विजेची गरज पूर्ण करण्याकरता कार्यक्षमता वृद्धी आणि तंत्रकुशल होणे गरजचे आहे. मुख्यमंत्री महोदय यांचे नेतृत्वामध्ये अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प गतीने पुर्ण करण्यास महानिर्मिती प्राधान्य देत असून महानिर्मितीचे व्हिजन २०३५ द्वारे आपण शाश्वत हरित ऊर्जेच्या दिशेने प्रवास करत असल्याचे प्रतिपादन, राधाकृष्णन बी., अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महानिर्मिती यांनी केले. ते महानिर्मितीच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त रंगशारदा सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी मंचावर मराविमं सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक (संवसु-१) पंकज सपाटे, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) नितीन चांदूरकर, कार्यकारी संचालक (पर्यावरण आणि सुरक्षा) डॉ. नितीन वाघ, कार्यकारी संचालक (प्रकल्प) विवेक रोकडे उपस्थित होते.

महानिर्मितीला उदंचन जल विद्युत प्रकल्प, इतर अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाद्वारे क्षमता वाढ करतांना अत्यंत अभ्यासपूर्ण, नियोजनबद्ध आणि गतिमानतेने निर्धारित लक्ष्य गाठावे लागणार आहे. त्यायोगे, प्रत्येकाचे योगदान अपेक्षित असल्याचे राधाकृष्ण बी. यांनी सांगितले.

मरावीमं सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक म्हणाले की, स्पर्धात्मक दरामध्ये वीज निर्मिती करताना प्रत्येक कर्मचाऱ्याने तत्पर राहणे गरजेचे आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारताला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनविणे तसेच राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे राज्याला १ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनविण्याच्या संकल्पामध्ये वीज क्षेत्राचे योगदान महत्वाचे असणार आहे.

संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे यांनी महानिर्मिती नफ्यात कशी राहील याचा ध्यास प्रत्येकाने घेणे आवश्यक असून महानिर्मितीच्या दोन दशकांच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याचे अमूल्य योगदान आहे. महानिर्मितीच्या वित्त विभागाने आर्थिक शिस्तीसह उत्तम वित्तीय नियोजन साध्य केल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क विभागाच्या समन्वयातून महानिर्मितीच्या सर्वंकष कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या चित्रफितीने वातावरण ऊर्जामय झाले. राज्यातील सर्व वीज निर्मिती केंद्रामधील उत्कृष्ट कार्य केलेल्या कर्मचाऱ्यांचा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच संचालक यांचे हस्ते यथोचित गौरव करण्यात आला, याप्रसंगी मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक, समकक्ष अधिकारी, विभाग प्रमुख, अधिकारी-अभियंते-कर्मचारी आणि कुटुंबीय तसेच कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानिर्मितीच्या मुख्यालय येथील अधिकारी-कर्मचारी यांनी सादर केलेल्या दर्जेदार सांगीतिक कार्यक्रमाने वर्धापन दिन सोहळ्याची सांगता झाली.

## कोपखैरणेमध्ये बुजवलेल्या रस्त्यात टेम्पोचे चाक रुतले; वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील सेक्टर १५ ते १८ च्या गार्डन समोरून पाईप लाईन लिकेज्च्या कामासाठी रस्ता खोदण्यात आला होता. काम पूर्ण झाल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात मातीने बुजवलेल्या खड्ड्यात टेम्पोचे चाक रुतले. हा टेम्पो रस्त्याच्या मधोमध अडकल्याने बराच वेळ वाहतूककोंडी झाली होती. या प्रकारामुळे पालिकेच्या गलथान कारभाराचे पुन्हा एकदा



चित्र दिसून आले.

कोपरखैरणे सेक्टर १५ ते१८ च्या उद्यानासमोर हा प्रकार घडला. हा परिसर रहदारीचा आहे . नेमके मार्केट भरण्याच्या वेळेस ज्यावेळी या भागात रहदारी असते त्याच सुमारास एक ४०७ टेम्पो या ठिकाणावरून जात होता. या ठिकाणी पाईपलाईनसाठी खड्डा करून ठेवले आहे मात्र काम पूर्ण होऊन रस्ता मातीने तसाच भरून ठेवला होता. सध्या पडणाऱ्या तुरळक पावसामुळे मातीचा चिखल झाला होता. या खड्ड्यात टेम्पोचा मागचा टायर फसला गेला. हे रुतलेले चाक बाहेर काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली.

## मांडवा जेट्टी येथे किरकोळ कारणावरून हाणामारी; चार जण जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मोटरसायकलवरून कट मारण्याच्या वादातून झालेल्या बाचाबाचीचे पर्यावसान हाणामारीत झाले. यात चार जाण जखमी झाले. त्यांना अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मांडवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मांडवा जेट्टी येथे दोन मोटरसायकलवरून आलेल्या चार जणांमध्ये कट मारण्यावरून बाचाबाची होऊन झटापट झाली. या वेळी कोळगाव आणि बोंडणी येथील सुमारे ५० लोक जमा झाले होते. याची माहिती मिळतच पोलीस तेथे पोहचले. त्यांनी जमाव पांगवला. मांडवा जेट्टी येथे नियंत्रण कक्ष स्ट्रियकिंगचे पाच व पोलीस ठाणेचे दोन अंमलदार तसेच बोंडणी येथेदेखील चार अंमलदार असा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परिस्थिती नियंत्रणात आली आहे. दोन्ही गटांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुरूड तालुका सुपारी संघाने बसवले सुपारी सोलण्यासाठी अत्याधुनिक मशीन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघातर्फे सुपारी सोलण्यासाठी अत्याधुनिक मशीन घेण्यात आली आहे . या मशीनचे उद्धघाटन मुरुड तालुका सुपारी संघाचे चेरमन अविनाश दांडेकर यांच्या शुभ हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले आहे.तर नियंत्रण मंडळ सदस्य नथुराम महाडिक यांच्या हस्ते मशीनचे बटन दाबून याचा शुभारंभ करण्यात आला.



मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची वार्षिक उलाढाल दहा कोटीच्यावर असून बागायतदारांना सुपारीला योग्य दर मिळवून देण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका सुपारी संघ मिळवून देत असतो.सुपारी संघाची सदस्य संख्या १७६४ असून या संघाची व्याप्ती संपूर्ण मुरुड तालुक्यात आहे.आपल्या बागायत जमिनीत लागवड केलेली सुपारी प्रत्येक खातेदार पिकवलेली सुपारी संघास देत असतो.मोठ्या प्रमाणात उत्पन्न झालेली सुपारी बाजारात झटपट विक्रीस जावी या हेतूने मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाकडून प्रयोगीक तत्वावर अत्याधुनिक टंड्रन्यान असणारी मशीन कोईमतूर येथून घेण्यात आली आहे.

या मशीनमुळे सुकलेली सुपारी मशीन मध्ये टाकताच साले बाजूला जाऊन सुपारी वेगळी होते.त्यामुळे सुपारी सोलण्याचा वेळ वाचून मार्केट मध्ये जलद गतीने सुपारी विक्रीस उपलब्ध होणार आहे,सुपारी संघास याचा मोठा फायदा होणार आहे.

नियंत्रण मंडळ सदस्य संजय गुंजाळ यांनी शुभेच्छा देऊन उपक्रमाबाबत प्रशंसा केली.यावेळी चेअरमन अविनाश (बाबा) दांडेकर,उप चेअरमन मुअज्ञमशेख हसवारे, संचालक अविनाश भगत, जनार्दन कंधारे,अमोल उपाध्ये,बाळा भगत, प्रकाश रणदिवे,हिफजुररहमान शेख ,नरेश पाटील, राजेंद्र गुरव,हाफीजु कबले,रामजी वणे,डॉ.अमित बेनकर, प्रविणचौलकर,विकास दिवेकर,भाग्यश्री बेलोसे,आसिया घलटे,उमाकांत चोरघे,तज्ञ संचालक राजेंद्र पोतनीस,प्रभाकर मसाल ,संजय गुंजाळ व थुराम महाडीक आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांनी एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करावा’

**कर्जत : प्रतिनिधी**

बदलत्या हवामानामुळे शेतकरी अडचणीत आला असून शेतकऱ्यांनी एकात्मिक शेतीचा अवलंब करावा असे आवाहन कर्जत भात संशोधन केंद्राच्या संशोधकांनी केले. कर्जत तालुक्यातील शेतकरी वर्गासाठी मार्गदर्शन शिबिर दापोली कृषी संशोधन केंद्राच्या कर्जत भात संशोधन केंद्राने आयोजित केले होते.

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, तालुका कृषी अधिकारी कार्यालय आणि पंचायत समिती कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी या गावात जनजागरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर कनिष्ठ भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई, प्रभारी तालुका अधिकारी हेमांगी सपकाळे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी संजय चव्हाण, कृषी विस्तार अधिकारी देविदास राठोड, मंडळ कृषी अधिकारी सचिन केणे, उप कृषी अधिकारी मंगेश गलांडे आदी अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रामबीजोत्पादक अनंत तातू बासरे यांनी आपले मत मांडले.

डॉ. महेंद्र गवई यांनी पोषणमूल्य असलेल्या



भात जाती आणि ग्राम बीजोत्पादनबद्दल माहिती दिली. तर दापोली कोकण कृषी विद्यापीठाने विकसित आणि शिफारस केलेल्या विविध भात बियाणांची वैशिष्ट्यपूर्ण माहिती देत शेतकऱ्यांनी त्याचीच लागवड करावी. शेतकर्यांनी नव नवे तंत्रज्ञान जाणून घेऊन विविध शिफारसींची अंमलबजावणी करावी असे त्यांनी नमूद केले.

पान १ वरुन

## शिवसृष्टीसाठी सरकारचे सर्वतोपरी सहकार्य

दरम्यान, या वेळी महाराजांना रायगड पोलिसांनी सशस्त्र सलामी व पोलीस बँड पथकाने मानवंदना दिली तसेच भांडुप येथील एका बँड पथकानेदेखील शिवरायांसमोर मानवंदना सादर केली.

या वेळी शिवरायांना अभिवादन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे मराठीच्या अस्मितेचा हुंकार आहे. इस्लामिक लाटेसमोर यादवांचे साम्राज्य संपले, मात्र शिवरायांच्या या राज्याभिषेकाने भारतात एकमेव हिंदू राज्य निर्माण झाले. महाराज खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. ते सर्व शास्त्रात आणि शस्त्रात पारंगत होते. त्यामुळे ते एक सर्वसाधारण राजा नसून देवाचा अंश होते.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले. यासाठी भारतीय सैन्य आणि आपले खंबीर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देत असून यामागे छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले. आम्ही शिवरायांची जयंती आग्र्याच्या तख्तावर साजरी करण्यास सुरुवात केली याचा आम्हाला अभिमान आहे, असेही ते म्हणाले.

राज्याभिषेक सोहळ्याचे स्वागताध्यक्ष मंत्री भरत गोगावले यांनी राज्याभिषेक सोहळा छोटा मोठा असा विचार आम्ही कधीच केला नाही, असे सांगून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी सर्वात प्रथम प्रतापगड येथील अफजलखानाच्या कबरीभोवती असलेले अतिक्रमण तोडले याकडे लक्ष वेधले. ते पुढे म्हणाले की, रायगडावर शेकडो वर्ष राहणाऱ्या धनगर समाजाला इथून कोणी हलवणार नाही याची हमी देतो. या कार्यक्रमाला युती सरकारने पाच कोटींची मदत केली असली तरी दोन कार्यक्रम मिळून ती कमी पडत असून हा निधी सात कोटी करण्याची मागणी त्यांनी या वेळी केली तसेच लवकरच शिवसृष्टीचे भूमिपूजन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## महावितरण लकी डिजिटल ग्राहक योजनेचा आज अंतिम लकी ड्रॉ

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा तिसरा व अंतिम लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने दि. १० जून रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभागस्तरावर एक प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिला जाणार आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जाणार आहे. दि. ७ एप्रिल व दि. ७ मे रोजीच्या पहिल्या व दुसऱ्या लकी ड्रॉ मधील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले आहे.

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. दि.१ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले ऑनलाईन पध्दतीने भरणाऱ्या सर्व लघुदाब वीज ग्राहकांना या योजनेचा फायदा होणार आहे.

या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन

वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील.

## रील पाहून १० लाख गमावले

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोलीत राहणाऱ्या व्यक्तीची ऑनलाइन टास्क पूर्ण करून पैसे कमावण्याच्या प्रयत्नात १० लाख २३ हजारांची फसवणूक झाली आहे. इन्स्टाग्रामवर रील पाहताना घरबसल्या कमवाच्या जाहिरातीला भुलून त्यांनी ही रक्कम गमावली आहे.

घणसोली परिसरात राहणाऱ्या ५० वर्षीय व्यक्तीला इन्स्टाग्रामवर घरबसल्या कमावण्याच्या व्यवसायाची लिंक मिळाली होती. त्यावर क्लिक केल्याने त्यांना व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आले. त्या ठिकाणी त्यांना टास्क पूर्ण करून सहजरीत्या पैसे कमावण्याची माहिती देण्यात आली.

त्याला भुलून सुरुवातीला त्यांनी काही रक्कम भरली असता त्यातून काही नफादेखील मिळवला. यावरून आपला फायदा होत असल्याचा विश्वास त्यांना बसल्याने त्यांनी टप्प्याटप्प्याने अधिक पैसे गुंतवले.अखेर त्याचा परतावा न मिळाल्याने त्यांनी रबाळे पोलिसांत धाव घेतली.

## वटपौर्णिमा पूजा साहित्य खरेदीसाठी गर्दी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील मुख्य बाजारपेठेत वटपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ विविध साहित्यांनी सजली असुन साहित्य खरेदीसाठी महिलांची लगबग सुरू झाली आहे. हा सकाळ पासून बाजारपेठ पूजेच्या साहित्यांनी बहरलेली पाहायला मिळली.

पतीराजांच्या दीर्घायुष्यासाठी वटपौर्णिमा हा सण मोठ्या थाटात सुवासिनी महिला साजरा करत असतात.हा सण येत्या मंगळवारी असल्याने बाजारपेठेत महिलांनी आज पासूनच वटपौर्णिमेच्या पूजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी महिलांच्या बरोबरीने पुरुषांनी देखील आपल्या पत्नीला पूजेचे साहित्य बाजारातून आणण्यासाठी गर्दी केली होती

वटपौर्णिमा साजरी करण्यासाठी आरसा, फणी, हळदी कुंकूचे करंडे, मणी मंगळसूत्र व वडाला गुंडाळण्याचा धागा हे साहित्य लागते.



# पनवेल रेल्वे स्टेशनकडील रस्त्याची डागडुजी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याची डागडुजी करण्यात आली आहे. या कामी आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात यांनी पाठपुरावा केला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १७ आणि प्रभाग क्रमांक २० मधील पाण्याच्या हौदा बाजूचा पनवेल रेल्वे स्टेशन कडे जाणारा रस्ता खराब झाला होता रस्त्यामध्ये खड्डे पडल्यामुळे पावसाचे पाणी साचून चिखल जमा होऊन अपघात घडण्याची शक्यता होती. रावसाहेब खरात यांनी पनवेल महानगरपालिका बांधकाम विभाग यांच्याकडे रस्त्याचा पाठपुरावा केल्यानंतर रस्त्यावर खडी टाकण्यात आली. स्थानिक नागरिकांनी आणि रेल्वे प्रवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर व रावसाहेब खरात यांचे आभार मानले.

लवकरच नवनाथ नगर, रेल्वे मालधक्का, भगत चाळ, लोकमान्य नगर वसाहतीतील रस्त्यावर आणि गल्ल्यामध्ये पाणी आणि चिखल होऊ नये म्हणून गल्ल्यामध्ये टाकण्यात येईल.





**पनवेल : कै. अनुसया गोवर्धन ठाकूर यांचे प्रथम पुण्यस्मरण सोमवारी होती. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिवाजीनगर येथे भेट देत अनुसया ठाकूर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली केले. या वेळी भाजप नेते कृष्णाशेठ ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शशिकांत ठाकूर, सागर ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटूंबीय उपस्थित होते.**

## भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत यांचे अभीष्टचिंतन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक तथा भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत यांचा वाढदिवस रविवारी (दि.८) साजरा झाला. वाढदिवसानिमित्त कामोठ्यामध्ये अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी पनवेल मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विकास घरत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.





या वेळी भाजपचे कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू, बबन मुकादम, भाजप नेते प्रदीप भगत, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेटकर, युवा नेते हॅप्पी सिंग, हर्षवर्धन पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पळस्पे येथे सामूहिक ध्यान कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पळस्पे येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात रविवारी हिमालयन समर्पण ध्यान संस्कार या भव्य सामूहिक ध्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरिक शांती आणि कल्याणाच्या प्रसारासाठी आयोजित या कार्यक्रमाचा पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, पळस्पे, करंजाडे, शिवकर, उरण, माणगाव आणि मुंबईतील सेंटर, हार्बर, वेस्टर्न येथील सुमारे साधकांनी याचा लाभ घेतला. ज्यामुळे विद्यालयाच्या परिसरात शांतता आणि सकारात्मक ऊर्जेने भरले होते. आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक शांतता आणि आंतरिक कल्याण अत्यंत आवश्यक आहे. सामूहिक ध्यानातून ही शांतता प्राप्त करण्यास मदत मिळते आणि आम्ही हाच संदेश अधिकाधिक



लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला.

या कार्यक्रमाला मिळालेला प्रचंड प्रतिसाद हे दर्शवतो की लोकांमध्ये अशा शांततापूर्ण उपक्रमांबद्दल किती उत्सुकता आहे. कार्यक्रमादरम्यान, उपस्थितांनी ध्यानधारणा केली. या उपक्रमाने केवळ वैयक्तिक शांतताच नव्हे तर सामुदायिक सौहार्ददेखील वाढीस लागल्याचे दिसून आले.





**पनवेल : भाजप प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक राजू सोनी उपस्थित होते.**

## एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक व्यक्ती कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



लक्ष्मण दत्तात्रय पाटील (५५ रा.वाजे) असे या इसमाचे नाव असून अंगाने सडपातळ, चेहरा उभट, केस पांढरे, दाढी पांढरी, वर्ण गोरा, डोळे काळे, नाक सरळ, उंची १६८ सेमी असून अंगात काळ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार अण्णासाहेब हसिबे यांच्याशी संपर्क साधावा.

## ज्योतीने तेजाची आरती...

# रावसाहेबांची जयंती... विवेक सावंतांचा सन्मान...



अॅड. रावसाहेब शिंदे



खासदार शरद पवार



विवेक सावंत



लोकनेते रामशेठ ठाकूर

**मधुकर भावे, ज्येष्ठ पत्रकार**

अॅड. रावसाहेब शिंदे यांच्या जन्मशताब्दीची सुरुवात १० जूनपासून होत आहे. ९९वर्षे पूर्ण होऊन रावसाहेब १००व्या वर्षात पाऊल ठेवणार होते.. आज रावसाहेब नाहीत... त्यामुळे जन्मशताब्दी वर्षात पाऊल ठेवण्याचा हा दिवस 'जयंती दिवस' म्हणूनच साजरा केला जात आहे. १० जूनऐवजी कार्यक्रम ११ जून रोजी आहे. रावसाहेब शिंदे हे अतिशय कर्तृत्वसंपन्न नेतृत्व होते. ते नामांकित वकील होते. श्रीरामपूर वकील संघटनेचे ते १७ वर्षे अध्यक्ष होते. 'गरिबांचे वकील' म्हणून ते प्रख्यात होते. सुरुवातीच्या तारुण्याच्या वर्षात ते कडवे कम्युनिस्ट होते. त्यावेळचा संपूर्ण अहमदनगर जिल्हा आणि त्यातील नेते कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला होता. रावसाहेबांचे मोठे बंधू आण्णासाहेब शिंदे हे पुढे सलग १८ वर्षे केंद्रीय कृषीमंत्री होते. नेहरूजींच्या मंत्रिमंडळातही होते. इंदिराजींच्या मंत्रिमंडळातही होते, पण त्यापूर्वी तेही कम्युनिस्ट होते. भाऊसाहेब थोरात कम्युनिस्ट होते, दत्ता देशमुख कम्युनिस्ट होते, बी. पी. कडू-पाटील कम्युनिस्ट होते.

स्वातंत्र्य चळवळीत शिक्षा भोगलेली ही नेतेमंडळी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'स्वातंत्र्य कष्टकऱ्यांसाठी आहे का?' या प्रश्नासाठी शेतकरी-कामगारांची बाजू घेऊन त्यावेळी अहमदनगर जिल्ह्यात लढत होते... किसान सभेची स्थापना त्यासाठीच झाली. या सर्व नेत्यांना त्यावेळचे मुख्यमंत्री मोरारजी देसाईंनी तुरुंगातही डांबले होते. या सर्व नेत्यांचा संघर्ष त्यावेळच्या अहमदनगर जिल्ह्याला परिचित आहे. महाराष्ट्रात अ-ह-म-द-न-ग-र असा एकमेव जिल्हा त्यावेळी होता... ज्याला काना-मात्रा-वेलांटी अजिबात नव्हती, पण या जिल्ह्यात राजकारणात जेवढ्या वेलांट्या होत्या... आणि आजही आहेत...अगदी अहमदनगरचे अहिल्यानगर झाल्यावरही... (या वेलांट्या आणि काना-मात्रे सुरूच आहेत.) त्या जिल्ह्यातील आण्णासाहेब शिंदे आणि रावसाहेब शिंदे हे बंधू यांचे काम फार मोठे... आण्णासाहेब तर फारच मोठे होते. देशातील कृषीक्रांतीमध्ये आण्णासाहेबांचे योगदान फार मोठे आहे. त्यांच्यावर स्वतंत्र पुस्तक प्रा. अशोक सोनवणे यांनी 'कृषीरत्न' या नावाने ४५० पानांचे पुस्तक लिहिलेलेच आहे. 'सोयाबीन' आणि 'सूर्यफूल' याची शेती आण्णासाहेबांमुळेच नवीन वाण आल्यामुळे आज प्रचलित आहे. त्यांचे बंधू रावसाहेब हे सत्तेत नव्हते. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर आण्णासाहेबांना, रावसाहेबांना...भाऊसाहेबांना काँग्रेसमध्ये आणले. दत्ता देशमुख आणि पी.बी. कडू-पाटील हे काँग्रेसमध्ये आले नाहीत. मराठवाड्यात उद्धवराव पाटीलही काँग्रेसमध्ये आले नाहीत. शे.का. पक्षामध्येच आयुष्यभर लढत राहिले. यशवंतरावांनी 'बेरजेच्या राजकारणा'चा हा प्रयोग महाराष्ट्राच्या भल्यासाठीच केला होता आणि त्यावेळी काँग्रेसमध्ये आलेल्या या सर्व नेत्यांनी त्यांच्या कर्तृत्वाला योग्य वाव मिळाल्यामुळे केवढे मोठे रचनात्मक काम उभे केले, हे महाराष्ट्राने पाहिले.

रावसाहेब शिंदे सत्तेत नव्हते..., पण जनतेच्या प्रश्नावर ते अतिशय आक्रमक आणि आग्रही असायचे. शिवाय साहित्य क्षेत्र असो.... शिक्षणक्षेत्र असो... रावसाहेब शिंदे हे आण्णासाहेबांच्या थोडेसे पुढेच होते. त्यांचे 'ध्यासपर्व' आत्मचरित्र वाचा... ते आत्मचरित्र किंवा 'शिक्षण आणि समाज', 'चरित्र्य आणि चारित्र्य'ही पुस्तके वाचा... त्यांच्या प्रत्येक पुस्तकात रावसाहेबांची बौद्धिक आणि सामाजिक उंची खूप मोठी असल्याचे जाणवते. शिवाय रावसाहेबांचा सामाजिक संपर्काचा पसारा खूप दांडगा होता. रावसाहेब हे रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी होते. 'रयत'मधूनच ते एल.एल.बी. होऊन वकील झाले, पण त्यांनी वकिली गरिबांसाठी केली. ज्या पक्षकाराजवळ पैसे नाहीत, अशांचे वकील हे रावसाहेब होते. पैशासाठी त्यांनी हा पेशा स्वीकारला नाही. शिवाय हा कर्तृत्त्वसंपन्न माणूस संघटक म्हणून मोठा होता. श्रीरामपूरसारख्या गावात त्यांनी 'रयत विज्ञाान परिषद' घ्यायचे ठरवले. त्यासाठी डॉ. रघुनाथराव माशेलकर यांना निमंत्रित केले. या विज्ञान संमेलनाचे बोधचिन्ह काय असावे...? 'ज्ञानेश्वरी ते विज्ञानेश्वरी' नेवासा येथील मिंदरातील 'पैस' म्हणजे... ज्ञानेश्वरांनी ज्या दगडी खांबाला टेकून ज्ञाानेश्वरी लिहिली त्या पाषाणाचे बोधचिन्ह करायचे ठरवले आणि ती विज्ञान परिषद मुंबई-पुण्यापेक्षाही यशस्वी झाली.

रावसाहेब यांचा जनसंपर्क आणि पत्रव्यवहार यावही एक पुस्तक आहे... यशवंतराव चव्हाण हे रावसाहेब शिंदे यांच्या श्रीरामपूरच्या घरी दोन दिवसांच्या मुक्कामासाठी आले होते, असे सांगितले तर आज खरे वाटेल का? श्रीरामपूर परिसरात रावसाहेब यांनी उभे केलेले शैक्षणिक आणि सांस्कृतिक काम... आणि त्या प्रत्येक कार्यक्रमात नामांकित नेत्यांना बोलावण्याची रावसाहेबांची जिद्द... रावसाहेबांचे वेगळेपण सांगून जायची... हा माणूस झपाटल्यासारखे काम करायचा... विनोबा भावे ग्रामीण प्रतिष्ठान, कुसुमाग्रज प्रतिष्ठान या संस्थांचेही ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या श्रीरामपूर शाखेचे ते कित्येक वर्षे अध्यक्ष होते. यशवंतराव चव्हाण हे रावसाहेबांच्या घरी विश्रांतीसाठी दोन दिवस रहायचे... यात रावसाहेबांचे मोठेपण अधिक उठून दिसते... एक दिवस यशवंतराव असे अचानक आले... संध्याकाळ झाली होती... आणि रावसाहेबांच्या पत्नी शशिकलाताईंनी यशवंरावांचे स्वागत केले. 'चहासोबत खायला काही करू का?' असे विचारले... यशवंतराव जणू आपल्या घरी असल्यासारखे सहज म्हणून गेले... 'छान, गरम कांदे-पोहे करा...' यशवंतरावांचे रावसाहेबांच्या घरी दोन दिवस राहणे... काय छान चर्चा झाल्या असतील... आज कल्पनाही करता येत नाही... त्या उंचीची माणसंही आता नाहीत. यशवंतराव चव्हाण आज नाहीत... आण्णासाहेबही नाहीत... आणि रावसाहेबही नाहीत..., पण ही यशवंतरावांची रावसाहेबांच्या घरी येण्याची दोन दिवसांची भेट... ग.दि. माडगूळकर आणि पु.ल. देशपांडे हे रावसाहेबांच्या शिंदे मळ्यात तब्बल आठ दिवस मुक्कामाला होते... ते आठ दिवस कसे गेले असतील याची कल्पना करा...

रावसाहेब सत्तेत नव्हते तरी... सत्ताधारी माणसांना ठणकावण्याची त्यांची ताकद होती. त्यांच्या ८१व्या वर्षी शरद पवारसाहेबांनी रावसाहेबांना रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्षपद दिले. माझा, रावसाहेबांचा संबंध त्याच काळात अधिक जवळचा आला आणि रावसाहेबांना खूप जवळून पाहता आले... टिपता आले... नी त्यांच्यातील 'मोठ्या मनाचा माणूस' जपून ठेवता आला. त्याच काळात मी 'यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने' १०० व्याख्याने देण्याचा संकल्प जाहीर केला होता आणि तो कमालीचा यशस्वी झाला. १००ची ११६ व्याख्याने झाली. १००वे व्याख्यान यशवंतरावांचा जन्म 'देवराष्ट्र' या गावातील ज्या घरात झाला त्या पडवीत १००वे व्याख्यान झाले. ही कल्पना रावसाहेबांची होती. पाच-सात लोक बसतील एवढीच जागा होती.

या वर्षभराच्या व्याख्यानाच्या खटाटोपात रावसाहेब शिंदे यांची भूमिका एखाद्या पालकासारखी होती. मला ते 'मधूजी' असे म्हणायचे. मला ते अवघड वाटायचे... रावसाहेबांनी माझी सहा ते सात भाषणे रयत शिक्षण संस्थेत वेगवेगळ्या ठिकाणी ठेवली. साताराचे भाषण खुल्या मैदानात मंडप उभारून विद्यार्थ्यांसाठी ठेवले. श्रीनिवास पाटील हे अध्यक्ष होते. यशवंतरावांबद्दलच्या त्यांच्या भावना ते प्रत्येक सभेत व्यक्त करत होते. 'यशवंतराव ते शरद पवार' ही महाराष्ट्राची पुरोगामी परंपरा अतिशय प्रभावीपणे ते मांडत होते. राजकारणातील चुकीच्या गोष्टींवर स्पष्टपणे ते आपली मते व्यक्त करत. बोलायला रावसाहेब कडक होते... वागायला कडक होते. चारित्र्याचा आग्रह प्रत्येक कामात दिसून येत होता, पण मनाने इतका मोकळा-ढाकळा आणि जीव लावणारा माणूस होता. त्यांचे वाचनही अफाट होते....

'रयत'चे कार्याध्यक्ष झाले त्याच काळात संगणकीय युग अवतरत होते. रावसाहेबांना हे जाणवले की, ग्रामीण भागात 'रयत'च्या सर्व शाळा आणि कॉलेजमध्ये संगणकीय शिक्षणाची गरज आहे. कर्मवीर आण्णांनी १९२४ साली सुरू केलेला हा शैक्षणिक यज्ञ ग्रामीण भागाचा परिवर्तन करणारा आहे. अशावेळी शैक्षणिक परिवर्तन करणारी ही संगणकीय शिक्षणपद्धती 'रयत'मध्ये आणून याचे शास्त्रीय शिक्षण दिले गेले पाहिजे..., पण हा एवढा मोठा खटाटोप करणार कोण? किती पैसा लागणार? रावसाहेबांना आठवण झाली ती विवेक सावंत यांची... रावसाहेबांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात बुधवारी याच विवेक सावंत यांना शरद पवारसाहेबांच्या हस्ते 'रावसाहेब शिंदे जीवनगौरव पुरस्कार' देऊन त्यांचा आदरपूर्वक सन्मान केला जाणार आहे..., कारण ही संगणकीय व्यवस्था 'रयत'च्या अवाढव्य पसाऱ्यात अवघ्या वर्षभरातच प्रत्यक्ष कृतीत आणणे हे सोपे काम नव्हते. एक तर शिक्षक, आध्यापक-प्राध्यापकांना प्रशिक्षण... आणि ग्रामीण भागातील मुलांना याच संगणकीय शिक्षणाची गोडी लावणे हे काम अवघड होते. त्यासाठी मोठी आर्थिक तरतूद करावी लागणार होती. रावसाहेबांनी हा विषय शरद पवारसाहेबांच्या कानावर घातला. पवारसाहेबांनी सहजपणे विचारले, 'सुरुवातीला किती तरतूद करावी लागेल...?' विवेक सावंत यांनी त्यांचा प्रस्ताव तपशीलवारपणे दिला... सुरुवातीला १२ कोटी रुपयांची गरज होती. एकूण प्रकल्प ३० कोटींवर जाणार होता. ही ३० कोटींची रक्कम ३० वर्षांपूर्वीची सांगतो आहे... आज त्याची किंमत किती कोटी आहे... विवेक सावंतसाहेबांनी प्रस्ताव तयार केला. संगणकीय क्षेत्रातील तज्ञ श्री. विजय भटकर असोत किंवा विवेक सावंत असोत... मला तर हे महाराष्ट्रासाठी सॅम पित्रोदाच वाटतात. (४० वर्षांपूर्वी त्यावेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या आग्रहामुळे सॅम पित्रोदा यांनी ग्रामीण भागापर्यंत एस.टी.डी.ची दूरध्वनी यंत्रणा कशी अंमलात आणली होती त्याची आठवण देशाला असेल...) ही सगळी नवीन शिक्षणपद्धती ग्रामीण भागातील मुलांना जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी आवश्यक होती. श्री. विजय भटकरसाहेब यांनी तर मराठी संगणकच तयार केला त्याचे नाव परम सुपर कॉम्पुटर. या पहिल्या मराठी वैज्ञाानिक प्रयोगात त्यांच्यासोबत विवेक सावंत हे होते. हे अनेकांना माहिती नसेल. त्या विवेक सावंत यांचे काम फार मोठे आहे. आज जगाच्या स्पर्धेत संगणकाने काय क्रांती केली आणि भारत नेमका कुठे आहे? हे सगळ्यांना जाणवत आहे. याचे रयतसारख्या एशियातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थेत ही नवीन संगणकीय व्यवस्था आणण्याचे श्रेय 'रयत'चे चेअरमन श्री. शरद पवारसाहेब आणि त्यावेळचे कार्याध्यक्ष रावसाहेब शिंदे आणि तंत्रज्ञ विवेक सावंत यांना आहे.

महाराष्ट्राने विवेक सावंत यांच्या संगणकीय ज्ञाानाची दखल फारशी घेतली नाही आणि त्यांना राज्य पातळीवर सन्मानित केले गेले नाही. त्याचा त्यांना फरक पडत नाही..., पण रावसाहेबांच्या जयंतीच्या निमित्ताने विवेक सावंत यांचा सत्कार होणे ही मला फार मोठी कृतज्ञाता वाटते. मुंबई-पुण्यापेक्षा हा सत्कार श्रीरामपुरात होणे... आणि तो शरद पवारसाहेबांच्या हस्ते होणे.... त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. रामशेठ ठाकूर असणे... (रामशेठ ठाकूर यांनी सातारा येथे 'रयत'साठी सात कोटी रुपयांची इमारत बांधून दिली आणि मोखाडा येथेही महाविद्यालय बांधून दिले.) या प्रत्येक व्यक्तीचे महत्त्व 'रयत'साठी फार महत्त्वाचे आहे. जेव्हा विवेक सावंत यांनी खर्चाचा पहिला १२ कोटींचा प्रस्ताव दिला... रावसाहेब थोडेसे हादरून गेले... रक्कम मोठी होती... त्यांनी पवारसाहेबांकडे प्रस्ताव पाठवला... पवारसाहेबांनी बैठक बोलवायला सांगितली.... १२ जणांना बोलावले... विवेक सावंत यांनी प्रस्ताव वाचला... रावसाहेबांना तपशीलात चर्चा केली... आणि पवारसाहेबांनी नावे घेऊन एकेकाला सांगितले....'पतंगराव तुम्ही एक कोटी....' (पतंगराव म्हणजे पतंपगराव कदम... भारती विद्यापीठाचे त्यावेळचे कुलपती...), 'रामशेठ तुम्ही एक कोटी...', 'सुप्रिया, तझ्या खासदार फंडातून एक कोटी...' पाठोपाठ एक एक नाव घेत १२ जणांची नावे घेवून पवारसाहेबांनी १२ मिनिटांत १२ कोटी रुपये उभे केले आणि 'रयत'मध्ये संगणकीय शिक्षणाला सुरुवात झाली.

अशी ही कर्तृत्ववान माणसं... संस्था कशी बांधायची हे आण्णांनी शिकवलं... ती कशी मोठी करायची... हे वसंतदादांनी दाखवले... आणि जागतिक स्पर्धेत त्या संस्थेला आशिया खंडात सर्वोच्च पदावर कसे न्यायचे याचा वस्तुपाठ रावसाहेब शिंदे आणि शरद पवारसाहेबांनी दाखवून दिला आहे. त्यामुळेच रावसाहेबांच्या जयंतीचा कार्यक्रम हा एका व्यक्तीच्या जन्मदिनाचा कार्यक्रम नाही.... हा महाराष्ट्रातील शैक्षणिक क्रांतीच्या सर्व वैज्ञाानिकांचा सन्मान आहे. विवेक सावंत यांचा सन्मान म्हणजे श्री. भटकर यांचाही सन्मान आहे... डॉ. माशेलकर, डॉ. नारळीकर, डॉ. गोवारीकर या सर्व ज्ञाान-विज्ञाानाचा झेंडा उंचावणाऱ्या कर्तृत्ववान विज्ञाान, संशोधकांचा हा सत्कार आहे आणि त्याचे निमित्त रावसाहेबांची जयंती आहे आणि म्हणून हा कार्यक्रम अनेक अर्थाने मोठा आहे. श्री. अॅड. भगिरथ शिंदे यांनी पुढाकार घेऊन त्या कार्यक्रमाचे आयोजन केले... त्याबद्दल त्यांचेही कृतज्ञातापूर्वक आभार मानले पाहिजेत. आजच्या राजकारणाच्या साठमारीत असे कार्यक्रम कुठे होणार हो...आणि करणार कोण? कोणाला काय पडले आहे... यशवंतरावांचा काळ संपला... रावसाहेबांचाही काळ संपला... पवारसाहेब तुम्हीच एक शेवटची आशा आहात... तुम्ही अशा कार्यक्रमांनाही लांबचा प्रवास करून येत आहात... तुम्ही नवीन कार्यकर्त्यांना केवढी ऊर्जा देणार आहात.... म्हणून या कार्यक्रमाचा आनंद वेगळा आहे.

## संपादकीय

# गर्दीचे प्रभावी नियोजन हवे

मुंब्र्यानजीकच्या दुर्दैवी अपघातामुळे पुन्हा एकदा लोकल गाड्यांमधील जीवघेण्या गर्दीचा विषय गांभीर्याने चर्चेत आला आहे. गेली अनेक वर्षे मुंबईकर व आसपासच्या परिसरातील चाकरमानी जीव मुठीत घेऊन या गर्दीतून प्रवास करत आले आहेत. नोकरी वा शिक्षणासाठी वेळेत पोहोचण्याच्या दबावातून अनके जण ही गर्दी टाळू शकत नाहीत. त्यामुळे रेल्वेकडून गर्दीच्या नियोजनाचे प्रभावी उपाय शोधत राहण्याला पर्याय दिसत नाही.

**चालू आठवड्याचा सोमवारचा पहिलाच दिवस सकाळीच एका दुर्दैवी लोकल अपघाताची बातमी घेऊन आला. मध्य रेल्वेच्या मुंब्रा व दिवा स्थानकांदरम्यान धावत्या लोकलमधून सुमारे १३ प्रवासी खाली पडल्याची घटना सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. यापैकी चार जणांचा मृत्यू झाला असून इतरांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर सर्व जखमींना तातडीने रुग्णालयांत दाखल करण्यात आले होते. कसाऱ्याहून सीएसएमटीला जाणारी लोकल दिवा स्थानकातून सुटल्यानंतर मुंब्र्याच्या आधी काही प्रवासी ट्रेनमधून पडले. नेहमीप्रमाणे प्रचंड गर्दीमुळे अनेक प्रवासी डब्याच्या दारात फूटबोर्डवर उभे होते. त्यांच्या पाठीवर बॅगादेखील होत्या. याचवेळी सीएसएमटीहून आलेली लोकल बाजूने जात असताना दोन्ही गाड्यांमधील दारात उभे असलेले प्रवासी एकमेकांवर घासले गेले. त्यांच्या बॅगाही आदळल्या. या धक्क्यामुळे १३ प्रवासी एकामागोमाग एक खाली पडले असे समजते. अपघात झाला तिथे दोन्हीकडच्या रुळांमधील अंतर कमी असल्याचेही सांगितले गेले आहे. कुणा प्रवाशाला उलटी होत असल्यामुळे डब्यात भांडण होऊन त्यातून तर हा अपघात झाला नाही ना, अशी शंकाही आहे. रेल्वेमार्फत अपघाताची चौकशी सुरू असून नेमके कारण समोर येईलच. दरम्यान, दिवा–मुंब्रा स्थानकांदरम्यानच्या धोकादायक वळणाकडे या अपघातानंतर अनेक राजकीय नेत्यांनी लक्ष वेधले. या वळणावरून भरधाव वेगाने गाडी चालवणे धोकादायक असल्याचे सांगितले गेले आहे. या तक्रारीकडेही रेल्वेला लक्ष द्यावे लागेल. गेली काही वर्षे रेल्वेकडून सातत्याने गाड्यांच्या डब्यांची संख्या वाढवणे, फलाटांची लांबी व उंची वाढवणे, स्वयंचलित जिने बसवणे, एसी गाड्या सुरू करणे यांसारख्या सुधारणा केल्या गेल्या आहेत. परंतु वाढत्या गर्दीपुढे या सुधारणा पुरेशा ठरलेल्या नाहीत. आता अपघात कमी करण्यासाठी गाड्यांना स्वयंचलित दरवाजे लावण्याचा विचार सुरू आहे. तसेच मोठ्या संख्येने एसी गाड्याही आणल्या जाणार आहेत. सर्व लोकल वातानुकूलित केल्या जाव्यात अशीही मागणी आहे. पण सर्वांना परवडतील असे दर ठेवले तरच सर्वसामान्य प्रवासी तिथे जाऊ शकेल असे प्रवासी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. काही नेत्यांनी नेहमीप्रमाणे रेल्वेतील अशा अपघातांबद्दल परप्रांतियांच्या लोंढ्यांना जबाबदार धरले. परंतु अशा वादग्रस्त विधानांमधून समस्येवर तोडगा निघू शकत नाही. मुंबई महानगर प्रदेशात मेट्रोचे जाळे कार्यान्वित झाल्यावरही गर्दीचा ताण थोडाफार कमी होऊ शकेल अशी आशा आहे. उपनगरीय रेल्वेतून पडून रोज सरासरी सात प्रवाशांचा मृत्यू होतो ही अत्यंत चिंताजनक आकडेवारी आहे. या अपघातांचे खापर प्रवाशांवरच फोडून निश्चितच चालणार नाही. गांभीर्याने व सातत्याने गर्दीच्या नियोजनाचे उपाय शोधण्याला पर्याय नाही. सरकारी व खाजगी कार्यालयांच्या कामकाजाच्या वेळा निरनिराळ्या ठेवण्याचे आवाहन आता पुन्हा करण्यात आले आहे. वेळांमधील अंतर प्रत्यक्षात येते का याकडेही लक्ष दिले पाहिजे. उपनगरी रेल्वेला कायमच मुंबईची 'लाइफलाइन' संबोधले गेले आहे. ती मृत्यूचा सापळा कदापि ठरता कामा नये.**

# पेणच्या घरगुती पापड उद्योगाची गगनभरारी

साध्या वरण भाताच्या जेवणालाही पापड लोणच्याच्या साथीने रुचकर बनवणारी आपली भारतीय खाद्य संस्कृती, यात पापडालाही तितकेच महत्त्व आहे. देशभरात उडीद पापडाचा  जास्त खप असलातरी आज विविध प्रकारचे पापड बाजारात उपलब्ध आहेत.





पुर्वी आजी, पणजी आपल्या घरातील सदस्यांकरिता घरगुती स्वरूपात पापड करायच्या, कालांतराने शहरातील महिला नोकरी निमित्ताने बाहेर पडल्याने तयार पापडांची मागणी जोर धरू लागली, यातूनच पापड उद्योगाची निर्मिती झाली. आज याच उद्योगाने देशभरात कोट्यवधी महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

गुजरात, राजस्थान मध्ये खीच्या पापड, केरळमध्ये पापडम, तमिळनाडूमध्ये अपलम, आंध्र प्रदेशात आपडम असे विविध राज्यात तांदळापासून बनणाऱ्या पापडांना संबोधले जाते. पेण हे भाताचे कोठार म्हणून प्रसिद्ध असल्याने तालुक्यात तांदुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. पेण चा आगरी समाज भात शेती लावण्यामध्ये अग्रेसर आहे. या समाजामध्ये घराघरात आजही तांदूळ पापड, कुरडई याला विशेष महत्त्व आहे परंतु त्याचे म्हणावे तेवढे व्यावसायिकरण झालेले नाही. याच तांदळापासून पोहे व पोह्यापासून पोह्याचे पापड करण्याच्या उद्योगाची मुहूर्तमेढ सुमारे ९० वर्षांपूर्वी रोवली गेली. पेणच्या पापड उद्योगाच्या जनक राधा काकू जोशी, मनोरमा सदाशिव साने, , नलिनी गणेश करमरकर,अन्नपूर्णा काशिनाथ मोघे यांनी स्वतःचा पापड व्यवसाय सुरू करून अनेक महिलांना पापड बनवायचे व लाटायचे प्रशिक्षण दिले. जयलक्ष्मी विठ्ठलदास शहा, वेणू रामचंद्र रामधरणे, सुमित्रा अपराध ही त्यातील काही प्रमुख नावे. कालांतराने याच मंडळींनी स्वतःचा पापड व्यवसाय सुरू केला. नलिनी करमरकरांकडे पापडासाठी लागणारे तिखट गिरणीतून न आणता मिरच्या आणून घरीच दगडी उखळीत कुटून बनवत असे.

यमुना वाड, शांताबाई रामचंद्र जगनाडे यांचाही उल्लेख येथे आवर्जून केला जातो. प्रचंड जिद्द व मेहनत करण्याची ताकद या सर्व महिलांमध्ये होती. नीलम प्रकाश शहा, सुरेश रामचंद्र रामधरणे यांचा पोहा पापड आजही प्रसिद्ध आहे. उखळ, मुसळ, जाते ही पापड बनवण्यासाठी लागणारी पारंपरिक दगडी साधने. कालांतराने या साधनांची जागा यंत्राने घेतली असलीतरी आजही हाताने लाटलेल्या पापडांना जास्त मागणी आहे.

१९६८–१९७१ च्या काळात पापड उद्योगाला लागणारे पोहे अनेक वेळा पेण मध्ये उपलब्ध नसल्याने रोह्याला जाऊन परमिटवर आणायला लागायचे. अनेक अडचणींवर मात करूनआज हा उद्योग बहरला आहे. पूर्वी दळणवळणाची साधने एवढी नव्हती. कालांतराने एसटी बसने मुंबई, पुणे, ठाणे येथे पापड पाठवण्याची सोय झाली. जसजसे एसटीचे जाळे पसरले तसतसे पेणच्या पापडांना विविध शहरांमध्ये बाजारपेठ उपलब्ध झाली. रायगड जिल्ह्यातील पाली, अलिबाग, किहिम, नागाव, मुरुड, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर या पर्यटन स्थळांवर पापडांना वाढती मागणी असल्याने या उद्योगाला चांगली बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

पारंपरिक पोहा पापड व्यक्तिरिक्त उद्योगजक समीर साने इत्यादी मंडळींनी टोमॅटो, पालक, मेथी, बीट, अशा विविध प्रकारच्या भाज्यांचे नवनवीन पापड प्रकार बाजारात आणले. या नवीन प्रयोगामुळे व्यवसायात वैविध्य निर्माण झालं व ग्राहकांची पसंती ही मिळाली. वाफेवर तयार करण्यात आलेल्या तांदुळाच्या ओल्या फेण्याचे उत्पादन करण्यात शरद जोशी व अरुणा जोशी दाम्पत्यांचा मोठा वाटा आहे. हाच वारसा आता नेहा लिमये यांनी चालविला आहे. होळीच्या सणाला तांदळाच्या फेण्यांचे महत्व असते. होळीला नैवेद्य फेण्यांचा दाखविण्यात येतो. लग्न समारंभात ही या पापड व फेण्यांचे महत्त्व असते. आज रायगड जिल्ह्यात सुमारे ४०० ते ५०० पापड लघुउद्योग आहेत. यामधून सुमारे ३० ते ३५ हजार लोकांना रोजगार मिळतो.

पेणचा पापड सुप्रसिद्ध पंचतारांकित हॉटेल ताज ग्रुपच्या मेनूमध्ये आज झळकतोय. पेण येथील उद्योजिका हर्षदा संदीप मोने यांनी मोने फुड्स अँड कॉंडिमेन्ट्स ट्रेडिंग ही कंपनी स्थापन करून शहरातील उत्तम दर्जाच्या पापड उत्पादकांकडून पापडांचे सॅम्पल एकत्रित करून ते पंचतारांकित हॉटेल्स पर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी ताज समूहाचे तत्कालीन कॉर्पोरेट शेफ आनंदा सोलोमन यांची भेट घेतली. त्यांना पेणचा पापड आवडला. काही दिवसातच ताज ग्रुपची पहिली ऑर्डर प्राप्त झाली. ताज समूहाची एकूण शंभरच्या वर हॉटेल्स देशभरात आहेत. ताज प्रेसिडेंट मुंबईची पहिली ऑर्डर पूर्ण केल्यानंतर गोवा, बंगलोर, हैदराबाद, चेन्नई, केरळ, अहमदाबाद, जयपुर, उदयपूर, जोधपुर, नवी दिल्ली, लुधियाना, अगदी थेट अमृतसर पर्यंत पेणचे पापड पोहोचले. यानंतर ही घोडदौड अनेक पंचतारांकीत हॉटेलमध्ये सुरू झाली. ताज समूहा व्यतिरिक्त रेडिसन ब्लू, लीला, ललित, हॉलिडे इन, जेडब्ल्यू मॅरियट, फेअरमॉन्ट, नोवोटेल अशा देशभरातील सुमारे १० पंचतारांकित हॉटेल्स मध्ये पेणच्या घरघुती पापड उद्योगाने बाजी मारली. टाटा समूहाचा व्यवहार अत्यंत पारदर्शक आहे. बिलासाठी कोणालाही साधा चहा सुद्धा पाजावा लागत नाही असा अनुभव हर्षदा मोने यांनी बोलून दाखवला.

ताज समूहात एक्झिक्युटिव्ह शेफ पदावर कार्यरत असलेले अलिबाग येथे शिक्षण घेतलेले अभिजीत ठाकरे यांनीही या उद्योगाला विविध राज्यातील ताज ग्रुपच्या अनेक पंचतारांकित हॉटेलमध्ये स्थान मिळवून देण्याकरिता मोलाचे योगदान दिले. २०१८ च्या देशाच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला अनेक देशातील राष्ट्राध्यक्षांना निमंत्रित केले होते. २५ जानेवारी २०१८ रोजी आपल्या देशाच्या पंतप्रधानांसह आलेल्या या विशेष पाहुण्यांची भोजन व्यवस्थेची जबाबदारी ताज डिप्लोमॅटिक इन्क्लेव्ह दिल्लीची होती. या शाही जेवणाच्या मेनूमध्ये पेणचे पापड ही होते हि अभीमानाची बाब आहे.

पापड उद्योगालाही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पावसाळ्यातील ४ महीने हा पापड व्यवसाय बंद असतो. या काळात काही उत्पादक कोळशाच्या भट्टीवर पापड वाळवून तयार करतात. अनियमित होणारा वीजपुरवठ्याचा फटकाही या उद्योगाला बसतो. कुशल कामगारांच्या उपलब्धतेची समस्याही मोठी आहे. सर्व पापड उद्योगांच्या पापडांचा दर्जा एक समान नसल्याने ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. उत्पादकाला आपला उद्योग वाढविताना बँकांकडून कर्ज मिळवण्याकरिताही मोठी कसरत करावी लागते. पापड उत्पादक संघटित नसल्याने त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचत नाही. शासनाकडून त्यांच्या समस्या सोडविण्याकरिता गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. सरकार दरबारी लहान मोठ्या पापड उद्योगांची नोंदच नाही. या उद्योगाच्या वाढीकरिता करीता शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या योजना आखल्या जात नाहीत. रायगड जिल्ह्यात दोन खासदार व बहुतांशी आमदार सत्ताधारी पक्षांचेच आहेत. त्यांनी या उद्योगाकडे सकारात्मक दृष्टीने पाहून त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करावे अशी अपेक्षा पापड उत्पादकांकडून केली जात आहे.

पापड उत्पादकांनी उत्तम दर्जाचा कच्चा माल वापरणे, पॅकिंग, ब्रॅण्डिंग, बिलिंग, प्रभावी जाहिरात, शासन दरबारी उद्योगाची नोंद करणे ह्या गोष्टीची पुर्तता केल्यास या उत्पादनांना सुपर मार्केट, पंचतारांकित हॉटेल्स, मॉल्स इत्यादी मध्ये बाजारपेठ उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे पापडांची विविध देशांमध्ये निर्यातही होऊ शकेल.यामुळे पापड उद्योगाची भरारी क्षितिजा पलीकडे होईल हे मात्र निश्चित...

**–संदीप मोने, पेण**



## बदलते तंत्रज्ञान

# आयफोन आणि आयपॅडचा युट्युब सपोर्ट थांबणार

जर तुम्ही अजूनही जुना आय फोन किंवा आय पॅड वापरत असाल, तर ही माहिती तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. यु ट्युब ने अलीकडेच त्यांच्या ॲपचं नवीन अपडेट (व्हर्जन २०.२२.१) जारी केलं असून, यामुळे आय ओ एस 16 किंवा त्यापुढील व्हर्जनवर चालणाऱ्या डिव्हाइसेससाठीच ॲपचा सपोर्ट उपलब्ध असेल. त्यामुळे आय ओ एस 15 किंवा त्यापेक्षा जुन्या व्हर्जनवर असलेल्या डिव्हाइसेसवर यु ट्युब ॲप चालणार नाही.





या बदलाचा फटका मुख्यतः आय फोन 6s, आय फोन 7, पहिल्या पिढीचा आय फोन SE, आय पॅड mini 4,आय पॅड -Air 2 आणि सातव्या पिढीचा आय पॅडTouch वापरणाऱ्यांना बसणार आहे. हे डिव्हाइस आय ओ एस १५ पर्यंतचे अपडेट्स मिळवू शकतात, मात्र आय ओ एस १६ ला सपोर्ट करत नाहीत. जर तुमचं डिव्हाइस या यादीत येत असेल आणि आय पॅड आय ओ एस 16 ला अपडेट होऊ शकत नसेल, तर यापुढे तुम्हाला यु ट्युब ॲप वापरता येणार नाही. मात्र, एक पर्याय म्हणून तुम्ही Safari किंवा इतर ब्राउझर वापरून यु ट्युब .कॅाम वरून व्हिडिओ पाहू शकता. पण ॲपमध्ये मिळणाऱ्या काही खास सुविधा जसं की, ऑफलाइन व्हिडिओ सेव्हिंग, स्मूथ स्क्रोलिंग किंवा उच्च दर्जाचं स्ट्रीमिंग, ब्राउझरमध्ये मिळणार नाहीत.

ॲप डेव्हलपर्सकडून जुन्या डिव्हाइसेसचा सपोर्ट बंद होणं ही नवीन गोष्ट नाही. याआधी Whats-pp Zohr अशा जुन्या डिव्हाइसेससाठी सपोर्ट थांबवला होता. यामागचं कारण म्हणजे नव्या डिव्हाइसेसमध्ये अधिक चांगले सुरक्षा फीचर्स आणि परफॉर्मन्स असतो, ज्यामुळे ॲप्स अधिक चांगल्या प्रकारे चालतात. जर तुम्हाला यु ट्युब ॲप वापरणं गरजेचं असेल, तर आय ओ एस 16 किंवा त्यावरील व्हर्जन सपोर्ट करणारा नवीन आय फोन किंवा आय पॅड घेण्याचा विचार करता येईल. जुन्या डिव्हाइसवर ॲप्स काम करत नसतील, तर हा अपग्रेड करण्यासाठी योग्य काळ असू शकतो. ज्या यूजर्सकडे अजूनही अशी जुनी डिवाइसेज आहेत त्यांचे डिव्हाईस आता अपग्रेड करण्याची वेळ आली आहे. कारण आता जुन्या डिव्हाईसवर YouTube आणि WhatsAppसारखे आवश्यक ॲप सपोर्ट थांबवत आहेत.

# भारतीय बॅडमिंटनपटू प्रकाश पदुकोण



## निमित्त

प्रकाश पदुकोण हे भारतीय बॅडमिंटनचे प्रणेते म्हणून ओळखले जातात. १९८०मध्ये त्याला जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांक मिळाला. त्याच वर्षी ऑल इंग्लंड बॅडमिंटन चॅम्पियनशिप जिंकणारे ते पहिले भारतीय बनले. प्रकाश पदुकोण यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत विजयी सिलसिला सुरू ठेवला आणि १९८९मध्ये खेळाडू म्हणून निवृत्त होण्यापूर्वी २०हून अधिक आंतरराष्ट्रीय पदके जिंकली. निवृत्तीनंतरही त्यांनी खेळात सक्रिय सहभाग घेतला आणि १९९३ आणि १९९६मध्ये भारतीय राष्ट्रीय बॅडमिंटन संघाचे प्रशिक्षक म्हणून काम केले. त्यांच्या प्रचंड समर्पणासाठी आणि त्यांनी देशाला दिलेला गौरव, प्रकाश पदुकोण यांना १९७२मध्ये अर्जुन पुरस्कार आणि १९८२मध्ये पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले.

पदुकोण क्रीडा व्यवस्थापनाची स्थापना प्रकाश पदुकोण यांनी २००२मध्ये तरुण बॅडमिंटन खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी केली होती. प्रकाश पदुकोण यांचा जन्म १० जून १९५५ रोजी बेंगळुरू, कर्नाटक येथे झाला. त्यांचा जन्म अशा वेळी झाला जेव्हा भारत बॅडमिंटनबद्दल फारसा उत्साही नव्हता. खरं तर, दक्षिण भारतात बॉल बॅडमिंटन नावाच्या खेळाचे जास्त वेड होते, जो व्हॉलीबॉलसारखाच आहे. त्यांचे वडील रमेश पदुकोण यांनी बॅडमिंटन खेळाची सुरुवात केली. त्यांनी अनेक वर्षे म्हैसूर बॅडमिंटन असोसिएशन चे सचिव म्हणून काम केले. पदुकोणची पहिली अधिकृत स्पर्धा १९६२मध्ये कर्नाटक राज्य ज्युनियर चॅम्पियनशिप होती. कोर्टवर 'जेंटल टायगर' म्हणून ओळखला जाणारा, बॅडमिंटन जगतात त्याची कामगिरी उल्लेखनीय आहे. तो फक्त १६ वर्षांचा असताना त्याने इंडियन नॅशनलमध्ये पहिला राष्ट्रीय पुरुष एकेरी जिंकला (त्याने नॅशनलमध्ये ज्युनियरचे विजेतेपदही जिंकले) आणि १९७१ ते १९७९पर्यंत सलग नऊ वर्षे जिंकले.

१९८० हे त्याचे सर्वोत्तम वर्ष होते. डॅनिश ओपन आणि स्वीडिश ओपन जिंकण्यासाठी त्याने शीर्ष युरोपियन खेळाडूंवर वर्चस्व राखले. ऑल–इंग्लंडमध्ये तिसरे मानांकित, त्याने उपांत्य फेरीत मॉर्टन फ्रॉस्टला आणि फायनलमध्ये लिम स्वि किंगला सरळ गेममध्ये पराभूत केले, अशा प्रकारे हा अभूतपूर्व पराक्रम करणारा तो पहिला भारतीय ठरला.

१९९१मध्ये स्पर्धात्मक खेळातून निवृत्ती घेतल्यानंतर, प्रकाश पदुकोण यांनी थोड्या काळासाठी भारतीय बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम केले. याव्यतिरिक्त, त्यांनी १९९३ ते १९९६ पर्यंत भारतीय राष्ट्रीय बॅडमिंटन संघाचे प्रशिक्षक म्हणून काम केले. त्यांनी गीत सेठी सोबत ऑलिम्पिक गोल्ड क्वेस्टची सह–स्थापना केली, ही संस्था भारतातील ऑलिम्पिक खेळांच्या प्रचारासाठी समर्पित आहे.

आज सायना नेहवाल, पी.व्ही. सिंधू यांच्यासारखे खेळाडू बॅडमिंटन गाजवत आहेत ,ऑलंम्पीक मध्ये ही ड्ंका गाजवला पण त्यांच्याही पूर्वी या खेळात भारताचे नाव जागतिक पातळीवर नेण्यात प्रकाश पदुकोण यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे योगदान कदापि नाकारता येणार नाही.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात





## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यात मुलांना डब्यात काय द्यायचं?

पाऊस आणि शाळा सुरू होणं हे अगदी हातात हात घालूनच येतात. नुकतीच शाळा सुरू होते आणि हळूहळू पाऊसही जोर धरू लागतो. कितीही काळजी घेतली, सांभाळलं तरी अचानक जोरात पाऊस येणं, भिजणं आणि मग किरकोळ तब्येतीच्या तक्रारी सुरू होणं हे शालेय विद्यार्थ्यांमध्ये, विशेषतः लहान वयाच्या मुलांमध्ये खूप कॉमन आहे. त्यात मुलांच्या खाण्याच्या बदलत्या सवयी अजून भर घालतात. त्यामुळे त्यांना शाळेत डब्याला काय द्यायचं असा प्रश्न महिलांना हमखास पडतो.





खूप उष्ण असणारं हवामान तीन चार दिवस सलग पाऊस पडला की एकदम गार होऊन जातं. पहिले काही दिवस जमिनीतून उष्ण वाफा निघत असतात, धूळ धुतली जात असते. पाणी एकदम गढूळ होऊन जातं. हे पाणी पचायला जड असतं आणि शरीरात अम्लता निर्माण करणारं असतं. त्यामुळे पोटाचे आजार, पचनाच्या तक्रारी, सिडिटी असे त्रास उद्‌भवतात. लहान मुलांमध्ये असं पाणी चुकून जरी पिण्यात आलं तरी पाण्यातून पसरणारे आजार पट्कन होण्याची शक्यता असते. जुलाब होणे, उलट्या होणे, पोट दुखणे, गॅसेस, टायफॉइड असे विविध आजार या दूषित पाण्यामुळे होऊ शकतात.

पचन शक्ती मंदावलेली असताना खाण्यात काही जड पदार्थ आले तर शरीर ते पचवू शकत नाही आणि पोट गुबारणे, काहीच खाण्याची इच्छा न होणे हेही या दिवसांत पहायला मिळते.

पावसात भिजून अंगावर ओले कपडे दीर्घकाळ राहिले, तर तो थंडावा बाधतो आणि सर्दी खोकला ताप या आजारांना निमंत्रण देतो.

अशावेळी करायचं काय, तर ज्या ज्या वेळी शक्य आहे त्या वेळी मुलांना गरमच खायला द्या, लहान मुलांच्या शाळा थोड्या उशीरा असतात व लवकर सुटतात. त्यांना घरुन काहीतरी गरम व पौष्टिक खाऊ घालून पाठवणे आणि पुन्हा घरी आल्यावर गरम खाऊ घालणं हा उत्तम उपाय आहे पण हा प्रॅक्टिकली दर वेळी शक्य होईलच असं नाही पण जेव्हा शक्य होईल तेव्हा तसा प्रयत्न नक्की करावा.

हवेत गारवा आल्यावर लहान मुलांना सर्दी खोकला वारंवार होतो आणि एका मुलाकडून दुसऱ्याला असं सारखं याची लागण होत राहते त्यामुळे गार पदार्थ, आंबट पदार्थ अजिबात देऊ नयेत.

# माणगावच्या शैक्षणिक संस्थेतून उत्तुंग भरारी घेऊन चांगले विद्यार्थी घडो -उपमुख्यमंत्री शिंदे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेतून वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उत्तुंग भरारी घेऊन चांगले विद्यार्थी घडो अशी इच्छा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले तर माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाला यापुढेही सर्वतोपरी सहकार्य करणार असे अभिवचन रायगड – रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खासदार.सुनील तटकरे यांनी दिले

शैक्षणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगूबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कुल माणगावची नवीन भव्य इमारत गणेशनगर याठिकाणी उभारण्यात आली असून या इमारतीचे उदघाटन सोमवार दि.९ जून रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाले.



या कार्यक्रमास राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत,रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले,आ.महेंद्र दळवी,माजी आ.अनिकेत तटकरे,माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड.राजीव साबळे,वंदना साबळे,नंदिनी साबळे,शिवसेनेचे संपर्क प्रमुख अरुण चाळके,जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे,माजी जिल्हा प्रमुख अनिल नवगणे,राष्ट्रवादीचे जिल्हा युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी,शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख रमेश मोरे,नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे,उपनगराध्यक्ष हर्षदा काळे,माजी नगराध्यक्ष आनंद यादव,शिवसेना माणगाव तालुका प्रमुख अँड.महेंद्र मानकर,,राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नितीन वाढवळ,भाजपचे राजेश मपारा,,माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे,संदीप खरंगटे,दिलीप जाधव,राजेश मेहता,सचिन बोंबले,माजी नगरसेवक जयंत बोडेरे,पाणी पुरवठा सभापती कपिल गायकवाड,महिला व बालकल्याण समिती सभापती नंदिनी बामगुडे,नगरसेवक दिनेश रातवडकर,नगरसेविका रिया उभारे,लक्ष्मी हिलम,मुख्याधिकारी संतोष माळी,सेक्रेटरी कृष्णा गांधी,सीबीएसई स्कुल चेअरमन निकिता जैन,स्कुल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड,अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाचे चेअरमन अँड.विनोद घायाळ,नर्सिंग कॉलेजचे चेअरमन डॉ. गौतम राऊत,संचालक डॉ.आबासाहेब पाटणकर,डॉ.तझिन रहाटविलकर,नितीन बामगुडे यांच्यासह आजी – माजी नगरसेवक,नगरसेविका,संस्थेचे पदाधिकारी, सदस्य,शिक्षकवर्ग,शिक्षकेतर कर्मचारीवृंद,पालक,विद्यार्थी,नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले कि,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक सोहळ्याला ३५२ वर्ष झाली तो कार्यक्रम रायगडला करून मी माणगावला सिबीएससी स्कुलच्या उदघाटन कार्यक्रमास आलो. या संस्थेचे अध्यक्ष राजुशेठ यांनी सिबीएससी स्कुलला माझ्या आईचे नाव दिल्याने मी त्यांचे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त करतो. शिक्षण हि काळाची गरज आहे. भविष्यातील पिढी घडवायची असेल तर शिक्षण शिवाय पर्याय नाही. आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये मराठी बरोबरच इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची तेवढीच गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी मन की बात कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षणाला विशेष महत्व दिले आहे. असे सांगत अँड.राजीव साबळे यांनी माणगावात शिक्षणाची वेगवेगळी दालने सुरु केल्याने या शिक्षण संस्थेला लागेल ती मदत करण्याचे आश्वासित केले.

माणगाव येथील बायपासचा काम केले जाईल असे सांगत एमएसआरडीचा काम युद्ध पातळीवर सुरु करून या भागात जास्तीत जास्त उद्योग धंदे आणण्याचा प्रयत्न असल्याचा त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष खा.सुनील तटकरे यावेळी बोलताना म्हणाले की,माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचा सिबीएससी शाळेच्या रूपाने नवीन शैक्षणिक दालन सुरु होत आहे. या सिबीएससी शाळेला मातोश्री गंगूबाई शिंदे नाव दिले या मातोश्रींनी उपमुख्यमंत्री शिंदेंसारखा कर्तृत्ववान मुलगा घडविला. त्यांच्याहस्ते आज या स्कुलचे उदघाटन झाले. माणगाव हे दक्षिण रायगडमधील एक महत्वाचे शहर आहे. या शहराचे महत्व ओळखून अँड. साबळे हे नवनवीन शैक्षणिक दालने माणगाव शहरात सुरु करीत आहेत.या शहरात सर्वदूर पद्धतीची शिक्षणाची आवश्यकता होती त्या दृष्टीने आपली संस्था पाऊल टाकत आहे. भविष्यात माणगाव तालुक्यात वेगवेगळे उद्योगधंदे येणार असून या गोष्टींचा विचार करून याठिकाणी आपल्या शाळेतून शिक्षण घेणारे विद्यार्थी नोकरीला लागावेत हा उद्देश नजरेसमोर ठेऊन अँड.राजीव साबळे हे शैक्षणिक प्रगती करीत आहेत असे सांगत त्यांनी संस्थेला शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना मंत्री.भरत गोगावले म्हणाले की, अँड.राजीव साबळे यांनी कोणतेही काम हाती घेतल्यावर ते पूर्ण झाल्याशिवाय गप्प बसत नाहीत. आपल्या संस्थेची यशाची पाऊले अशीच पुढे जावेत असे सांगत या शिक्षण संस्थेतून गोरगरीब जनतेच्या विद्यार्थ्यांना थोडे सहकार्य करा अशी विनंती त्यांनी केली. आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात बोलताना माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड.राजीव साबळे पुढे म्हणाले की,आमची हि शिक्षण संस्था १९५८ साली त्याकाळात दानशूर व्यक्तींनी व शिक्षणप्रेमींनी एकत्रित येऊन स्थापन केली. आमच्या तीन पिढ्या या शाळेत शिकल्या असून अनेकजण वेगवेगळ्या पदावर काम करीत आहेत. मी सन १९८७ मध्ये संस्थेचा कमिटी सदस्य झालो. १९९२ साली जिल्हा परिषदेवर निवडून आल्यावर माणगाव तालुक्यातील गोरगरीब जनतेची मुले–मुली शिकली पाहिजेत त्यांना माणगावात आवडीनुसार वेगवेगळे शिक्षण घेता यावे यासाठी त्यानंतर शिक्षण संस्थेत विशेष लक्ष घातले. जुनिअर कॉलेज,द.ग.तटकरे महाविद्यालय,शिपूरकर व वाघेरे इंग्रजी माध्यम शाळा,विधी महाविद्यालय,नर्सिंग कॉलेज व आता सिबीएससी स्कुल अशी शैक्षणिक दालने सहकाऱ्यांच्या मदतीने सुरु केले.

अँड.साबळे यांनी माणगाव शहरात सतत होणारी वाहतूक कोंडीच्या प्रश्नाकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खा.सुनील तटकरे,मंत्री भरत गोगावले,उदय सामंत यांचे लक्ष वेधत वाहतूक कोंडीचा हा प्रश्न लवकर सुटला नाही तर रस्त्यावर उतरल्याशिवाय आम्ही माणगावकर राहणार नसून याचे नेतृत्व मी करेन असे सांगितले.

## माथेरानमधील हातरिक्षा चालकांचे उपोषण स्थगित; अधिकाऱ्यांची मध्यस्थी



**माथेरान : बातमीदार**

माथेरानला हातरीक्षा ओढणाऱ्यांनाच ई–रिक्षा द्याव्या या मागणीसाठी हातरीक्षा चालक मालक संघटनेच्या काही सदस्यांनी उपोषण सुरू केले होते.येथील स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनंतर हे उपोषण स्थगित करण्यात आले.

सोमवार दि.९ रोजी सकाळी ११ वाजता येथील श्रीराम चौक येथे हातरीक्षा चालक मालक संघटनेच्या काही सदस्यांनी आपल्या न्याय हक्कासाठी लढा द्यायला सुरुवात केली उपोषणाने याचा आरंभ करण्यात आला.संघटना सदस्य नागेश कदम,अंबालाल वाघेला,राजू गायकवाड व इतर सदस्य आपल्या कुटुंबासह उपोषणास बसले होते.

सर्वोच्च न्यायालयाने २० ई–रिक्षा प्रायोगिक तत्वावर सुरू केल्या असून त्या फक्त हातरीक्षा चालकांनाच मिळाव्या तसेच इतर हातरीक्षा चालकांचे पुनवर्सन करावे या मुख्य प्रमुख मागण्यांसाठी हे उपोषण सुरू होते.अखेर सायंकाळी ४:३० वा.येथील मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे व सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांनी मध्यस्थी करून उपोषण स्थगित केले.

सर्व हातरीक्षा उपोषणकर्त्यांना एक पत्र देऊन उपोषणाला पूर्णविराम दिला या पत्रात पालिकेने असे म्हटले आहे की,सदर प्रकरण न्याय प्रविष्ट असून उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी सत्य प्रतिज्ञा पत्र घेऊन हा कार्यालयाकडील अहवाल शासनामार्फत सर्वोच्च न्यायालयात सादर केला असून त्यावर सुनावणी सुरू आहे, यावर न्यायालयाचा पुढील आदेशानुसार पुढील कारवाई शक्य होईल.माथेरान अधिकाऱ्यांच्या मध्यस्थी हातरीक्षा चालकांनी मान्य करत मुख्याधिकारी व स.पो.नि यांच्या हातून सरबत घेऊन उपोषण मागे घेतले.

## माणगावात उद्या नेत्र तपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.११) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत महेंद्र पितांबर मेथा यांच्या हॉलमध्ये करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा, असे आवाहन माणगावचे सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्ररुग्णांची तपासणी केली जात असून ज्यांना मोतीबिंदू आहे अशा नेत्ररुग्णांना पनवेल येथे आयोजकांच्याच गाडीत घेऊन जाऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा माणगाव येथे आणले जाते.

## व्होल्टेजच्या समस्येने त्रस्त कर्जत विठ्ठलनगरवासीयांचे महावितरणला निवेदन



**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

विद्युत प्रवाहाच्या कमी दाबामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून यामुळे कर्जतकर त्रस्त आहेत.त्यामुळे येथील त्रस्त नागरिकांनी थेट वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांची भेट घेत त्यांना लेखी निवेदन सादर करुन ट्रान्सफॉर्मर बसवण्याची मागणी केली

वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंद्रे यांची सोमवार ( दि.९ ) रोजी विठ्ठलनगर वासियांनी भेट घेतली व त्यांना निवेदन सादर केले. सोनिया गरवारे यांच्या नेतृत्वाखाली पांडुरंग गरवारे, प्रल्हाद बहुगुणी, राजन दगडे, विलास चंदन, अवधूत केळकर, राजन वैशंपायन अ‍ॅड, सुषमा ढाकणे, बिराज पाटकर , सर्वेश गोगटे, अ‍ॅड. अभिषेक तिवारी, प्रशांत प्रभुणे, सचिन श्रीखंडे आदींनी भेट घेवून चर्चा केली व निवेदन सादर केले.

व्होल्टेज कमी मुळे त्याचा परिणाम विठ्ठलनगर वासियांच्या दैनदिनी जीवनावर होत आहे, ज्यामुळे लिफ्ट, रेफ्रिजरेटर, टेलिव्हिजन, पाणी पुरवठा आदी वर त्याचा परिणाम होत आहे. सध्याची ट्रान्सफॉर्मर क्षमता १०० केव्हीए आहे जी विठ्ठलनगर आणि आसपासच्या २० हून अधिक इमारतींना वीज पुरवते, ज्यामुळे व्होल्टेजमध्ये गंभीर चढ–उतार होतात. तसेच या परिसरातील काही पोल पडले होते ते पुन्हा उभारण्यात आले नाही ते पुन्हा उभे करावेत, २१५ किलोवॅट क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवण्याची मागणी या निवेदनाव्दारे केली जेणेकरून अखंडित व सुरळीत वीजपुरवठा होऊ शकेल.



**रोहा : शिवराज्याभिषेक दिनी शहरातील कुंडलिका नदी संवर्धन येथे साकारण्यात आलेल्या शिवसृष्टीमधील मेघडंबरी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुणबी समाज जेष्ठ नेते शिवराम शिंदे, माजी गटनेते महेंद्र गुजर, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, सरपंच संतोष कोळी, नरेश पाटील, राजू शिंदे, सुखद राणे, निलेश शिर्के, मयूर खैरे, स्वप्नील धनावडे, उमेश सावंत, नितीन कोलाटकर, मोहिते, शंतनु रटाटे, पाशिलकर, रायगड मेडिकल असोसिएशनचे खजिनदार डॉ. कुमार ओसवाल, डॉ. दिनेश चौराशिया, डॉ. गणेश मेंगाळ, डॉ. राहुल पाटील, डॉ. वैभव गायकवाड, डॉ. श्यामसिंग पावरा, सौ. पावरा, डॉ. मनीष परमार, डॉ. अमित ओसवाल, डॉ. प्रभाकर काळे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## कर्जत वनविभागाकडून अवसरे येथे वृक्षारोपण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात वन विभागाच्या पश्चिम विभाग यांच्याकडून मौजे अवसरे येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ३२१९ वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला.

हवामान बदल तसेच पर्यावरणात झालेल्या बदल,तसेच वाढत्या शहरीकरण यामुळे हरित क्षेत्र कमी झाले आहेत. त्यामुळे अशा उपक्रमाद्वारे प्रत्येक व्यक्तीने आपली सामाजिक आणि नैतिक जबाबदारी स्वीकारून किमान एक तरी झाड लावणे आणि त्याचे संगोपन करण्याची शपथ कर्जत वन विभाग पश्चिम यांच्याकडून अवसरे येथे वृक्षारोपण कार्यक्रम अंतर्गत घेतली.

या वेळी पर्यावरणाची संपूर्ण माहिती या कार्यक्रमाच्या निमित्ताने देण्यात आली. वृक्षारोपण स्थानिक पातळीवर करंज,बेल,जांभूळ, साग,बांबू आदी झाडांची लागवड करण्यात आली. वृक्ष लागवड हा कार्यक्रम संरक्षित वनामध्ये वन विभाग तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समिती वनपरिक्षेत्र अधिकारी समीर खेडेकर कर्जत



पश्चिम,वनपाल सुगवे उदय मोरे, वैजनाथ फड वनपाल बोरगांव ,वनरक्षक पोशिर माधुरी बडे, वनरक्षक वारे संजीवन शीलवंत, वनरक्षक ओलमन प्रकाश कुंभार, सुनील कांबळे तसेच वनसेवक अशोक बदे, संतोष बदे, रवींद्र भोईर,काशिनाथ कांतीलाल पारधी,मंगल वारे, गणेश गावंडा,रितेश वायकर आदींनी वृक्षारोपण केले. या पावसाळ्यात कर्जत पश्चिम मध्ये एकूण ३२१९ वृक्ष वन विभागातील अधिकारी आणि कर्मचारी हे श्रमदानाने स्वतः खोदून प्रत्येक नियत क्षेत्रात वृक्ष लागवड करणार आहेत. माझे वन या संकल्पनेद्वारे अधिकारी वृक्ष लागवड येणाऱ्या काळात करणार आहेत

# तळा येथील बाजारपेठेत रानभाज्यांची आवक वाढली

### आदिवासी समाजाला मिळतोय आर्थिक आधार

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा दुर्गम व डोंगराळ भाग असून अनेक जातीधर्माचे लोक तळा तालुक्यात राहत आहेत .त्यातच अंदाजे २० पर्यंत आदिवासी वाड्या आहेत.पावसाळा सुरू झाला की,जंगलात आपोआप रानभाज्या उगवतात त्या भाज्यांचे वेध सगळ्यांना लागले असतात.



गेल्या काही दिवसांपासून तळा बाजारात रानभाज्यांची आवक वाढली आहे.त्यात कुडा, करटोळी,भारंगी,शेवळा, टाकळा, अळू, तेरी, दिंडा, रानकेळी, भोकर, कुडू इत्यादी भाज्या बाजारात मोठ्या प्रमाणात येत आहेत. या भाज्यांची एक जुडी २० रूपये ते ४० रूपयांना विक्री केली जात आहे.तसेच आळंबी बाजारात यायला अजून वेळ असल्याचे बोलले जात आहे. आळंबी बाजारात दाखल झाल्यानंतर ग्राहक जास्तीत जास्त वाटे खरेदी करून आपल्या परीचीतांना सुध्दा भेट देतात. फुललेल्या आळंबीचा वाटा ४० रूपये तर मुक्या आळंबीचा वाटा ६० ते ८० रूपयांच्या दरम्यान बाजारात विक्री केली जाते. तसेच शेवळा ही भाजी महिलांच्या आरोग्यासाठी चांगली असून तिच्यात ड जीवनसत्व असते.

या रानभाज्या या ठराविक काळातच मिळत असतात.तो सध्याचा काळावधी आहे.आणि या काळावधीत प्रत्येक व्यक्तीने या रानभाज्या एकदा तरी खाल्या पाहिजे.या रानभाज्यांमधे औषधी गुणधर्म असतात. पोटाचे विकार दुर होतात.शरीर तंदुरुस्त राहण्यास मदत होते. असे आर्युवेदात तर सांगितले आहेच पण जुने जाणकारसुध्दा हेच सांगतात.

## ‘विहिंप’च्या बैठकीत संघटन वाढीसाठी निर्णय

**नेरळ : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद – बजरंग दल नेरळ प्रखंडाची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीमध्ये संगठन वाढवण्यासाठी विशेष भर देण्यात आला.या बैठकीत नवनिर्वाचित समितीची घोषणा करण्यात आली यामध्ये विश्व हिंदू परिषदेच्या नेरळ प्रखंड अध्यक्षस्थानी चंदन भडसावळे यांची एकमताने निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी अंकुश मोरे यांची निवड झाली आहे.अलीकडे चाललेल्या हिंदू धर्मावरील अत्याचार किंवा हिंदूंच्या श्रद्धास्थानाची विटंबना यामुळे विश्व हिंदू परिषद व बजरंग दल या संघटनेच्या माध्यमातून धर्मरक्षणासाठी तरुण पुढे सरसावत आहेत.

धर्माभिमान आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी तरुण पिढीचा हिंदुत्वाच्यादिशेनेअधिक कल वाढतआहे. संपूर्णजगात हिंदूंचं प्रतिनिधित्व करणारी संघटना म्हणून विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांच्याकडे पाहिले जातआहे.विविध आयामांवर काम करण्यासाठी आत्ताचीतरुण पिढीउत्सुक

## आरएमए व निसर्ग मित्र मंडळातर्फे वृक्षारोपण

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

रायगड मेडिकल असोसिएशन व निसर्गमित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ८ जून रोजी वृक्षारोपण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम कर्जत येथील वेदमाता टेकडी येथे पार पडला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी यांनी निसर्गमित्र मंडळाच्या कार्याची व विशेषत दिलीप कदम यांच्या नेतृत्वाखालील उपक्रमांची स्तुती केली. त्यांनी वेदमाता टेकडीवरील सध्याच्या




हिरवळीचे कौतुक करताना, भविष्यात कोणतेही शासकीय विकास प्रकल्प राबवले गेले तरीही ही हरितभुमी अबाधित राहावी, अशी मागणी केली.

जशी माथेरानची ‘वन ट्री हिल’ तशी कर्जतची ‘वन थाऊजंड ट्री हिल’ प्रसिद्ध व्हावी असे आमचे उद्दिष्टं आहे असे निसर्गमित्र दिलीप कदम यांनी सांगितले. वृक्षारोपणाची सुरुवात पद्माकर गांगल रश्मी गांगल ह्यांच्या हस्ते झाली.

# सायबर गुन्हेगारांचा नवी मुंबईत धुमाकूळ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत गेल्या काही दिवसात सायबर गुन्हेगारांनी धुमाकूळ घातल्याचे चित्र आहे. शनिवारी एकाच दिवशी नऊ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. यात तब्बल एक कोटी ७८ लाख ९७ हजार ५८ रुपये सायबर गुन्हेगारांनी लांबवले आहेत. केवळ जून महिन्यात १२ वेगवेगळ्या सायबर गुन्ह्यात चार कोटी ३६ लाख ९७ हजार ५८ रुपयांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे सायबर साक्षरता करण्यास पोलीस कमी पडत असल्याचे चित्र आहे.



सीबीडी येथे राहणाऱ्या ६४ वर्षीय डॉक्टर व्यवसायीकाची १५ लाख ४० हजार ५६० रुपयांची फसवणूक झाली. त्यांना २२ मेला फोन करून एका व्यक्तीने डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियाच्या बेंगलोर कार्यालयातून बोलत असल्याचे सांगत मनी लॉन्ड्रींग, अतिरेकी संस्थांना आर्थिक मदत केल्याचा आरोप फिर्यादी यांना केला. तसेच डिजिटल अटक करण्याची धमकी देत १५ लाख ४० हजार ५६० रुपये स्वतःच्या खात्यात वळते करण्यास भाग पाडले. या दरम्यान फिर्यादी यांच्याशी संपर्क साधणाऱ्या चौकडी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

खांदेश्वर येथे राहणाऱ्या ६१ वर्षीय जेष्ठ नागरिकाला कुलाबा पोलीस ठाण्यात तुमच्या विरोधात गुन्हा दाखल आहे. असे सांगून अटक कारवाईची धमकी देत वेगवेगळ्या दोन बँक खात्यात २४ लाख ९० हजार वळते करण्यास भाग पाडले. फोन वर बोलणाऱ्याने स्वतःची ओळख पोलीस अधिकारी अमित गुप्ता म्हणून करून दिली होती. हा सर्व प्रकार ७ डिसेंबर ते १२ डिसेंबर दरम्यान घडला.

नेरूळ येथे राहणाऱ्या एका ६१ वर्षीय महिलेस सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शर्मा, सीबीआय अधिकारी विजय खन्ना, कायदे सल्लागार निशा पटेल यांनी फोन करून आमचे सिमकार्ड वापरून मनी लॉन्ड्रींग व्यवहार केला आहेत. कारवाईची धमकी देत त्यांच्या कडून विविध खात्यात १९ लाख रुपये वळते करण्यास भाग पाडण्यात आले. हा प्रकार १९ मार्च ते १७ एप्रिल दरम्यान घडला. दरम्यान, फिर्यादी यांच्या पतीचे निधन झाल्याने त्यांनी या बाबत ६ तारखेला गुन्हा दाखल केला.

ऐरोली येथे राहणाऱ्या एका महिलेची समाज माध्यमातून मुकेश शर्मा यांच्याशी ओळख झाली होती. त्याने इंग्लंड वरून भेटवस्तू पाठवली असल्याचे सांगितले. दरम्यान, सोनाली सिंग नावाच्या महिलेने फिर्यादी यांना फोन करून तुमची भेट वस्तू आली असून कस्टम कर भरून घेऊन जा. असे सांगत विविध स्वरूपाचे कर सांगत बँक खात्यात ४९ लाख ५९ हजार ९९९ रुपये भरण्यास भाग पाडले. हा प्रकार जून ते ऑगस्ट २०२४ दरम्यान घडला.

ऐरोली येथे राहणाऱ्या २८ वर्षीय तरुणीला नव्या पटेल, राकेश कुमार, स्वाती शर्मा आणि एक पोलीस अधिकारी यांनी संपर्क साधून आमच्या ओळख पत्रांचा गैरवापर केला आहे. असे सांगत कारवाईची धमकी देत विविध तीन बँक खात्यात २० लाख ३० हजार वळते करण्यास भाग पाडण्यात आले. हा प्रकार १ जानेवारी ते सहा जानेवारी दरम्यान घडला. प्रिंटिंग प्रेसचा व्यवसाय असणाऱ्या एका व्यक्तीला कर्जाचे आमिष दाखवून १४ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. फिर्यादी यांचे कार्यालय तुर्भे एमआयडीसी येथे आहे. फेब्रुवारी मध्ये कौशिक लाठिया नावाच्या व्यक्तीने त्यांना फोन करून सात कोटी रुपयांच्या कर्जाचे आमिष दाखवले होते. मात्र त्यासाठी स्टॅम्प ड्युटी म्हणून १४ लाख रुपये स्वतःच्या खात्यात भरण्यास भाग पाडले होते.

पनवेल येथे राहणाऱ्या ३९ वर्षीय व्यक्तीने सट्टा बाजारात पैसे गुंतवा आणि भरघोस नफा कमवा अशा जाहिरातीला बळी पडून २३ लाख १७ हजार ४९९ रुपये गमावले आहेत. हा प्रकार फेब्रुवारी ते ९ एप्रिलदरम्यान घडला. या प्रकरणी जीएमझेड या इंटरनॅशनल कंपनी ट्रेडिंगच्या नावाने व्हॉट्सअॅपवर चॅटिंग करणाऱ्या २२ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशाच प्रकारे नेरूळ येथे राहणाऱ्या ४६ वर्षीय व्यक्तीची २३ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. फिर्यादी यांना सट्टा बाजारात आमच्या द्वारे गुंतवणूक करा भरघोस परतवा मिळेल असे आमिष दाखवून विविध बँक खात्यात गुंतवणूक रक्कम घेण्यात आली होती. हा प्रकार ७ मार्च ते २४ एप्रिलदरम्यान घडला आहे.

## रिक्षातील प्रवाशाला लुटणाऱ्या चालकासह साथीदार अटकेत

**नवी मुंबई : बातमीदार**

रिक्षा प्रवाशाला मारहाण करून लुटल्याप्रकरणी एपीएमसी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीचा दोन लाख ९० हजारांचा ऐवज पोलिसांनी हस्तगत केला आहे. दोघांनीही पहिल्यांदाच हा गुन्हा केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज असून, एपीएमसी पोलीस अधिक तपास करत आहेत.

तुर्भे येथून कुर्त्याला निघालेले ट्रान्सपोर्ट व्यावसायिक प्रवीण सुर्वे यांच्यासोबत ३० मे रोजी हा प्रकार घडला होता. मध्यरात्रीच्या सुमारास ते मद्यधुंद अवस्थेत रिक्षाने प्रवास करत होते. या वेळी रिक्षाचालक व त्याच्या साथीदाराने ते नशेत असल्याचा फायदा घेऊन त्यांना लुटण्याच्या उद्देशाने आडोशाच्या ठिकाणी नेऊन मारहाण करून त्यांचा दोन लाख ९० हजारांचा ऐवज लुटला होता. या प्रकरणी सुर्वे यांनी एपीएमसी पोलिसांकडे केलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला होता. याचदरम्यान शहरात इतरही ठिकाणी रिक्षाचालकाने प्रवाशांना लुटल्याच्या घटना घडल्या होत्या. यामुळे गुन्हेगार चालकांचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ निरीक्षक अजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सहायक निरीक्षक नीलेश पाटील यांचे पथक गेले होते. त्यांनी सीसीटीव्हीच्या मदतीने संशयित रिक्षाची माहिती मिळवून तिचा शोध घेतला.

यामध्ये तुर्भे परिसरातच ती रिक्षा मिळाली. त्यावरून स्वप्निल गायकवाड (वय २०) व त्याचा मित्र ओंकार गायकवाड (वय १९) यांना अटक केली. स्वप्निल हा रिक्षाचालक असून, त्याच्या रिक्षातून दोघेही रात्री फिरत असताना त्यांच्या रिक्षात प्रवीण सुर्वे बसले होते. या वेळी ते नशेत असल्याने त्यांना लुटले तरीही पकडले जाणार नाही या भ्रमात त्यांनी गुन्हा केला. तशी गुन्ह्याची कबुली त्यांनी दिली असून, त्यांच्याकडून चोरलेला ऐवजदेखील पोलिसांनी हस्तगत केला आहे.

## सानपाडा, जुईनगर रेल्वे कारशेड परिसरातील नालेसफाईची कामे सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

आठवड्यात मुसळधार पाऊस पडला होता. त्यामुळे सीबीडी बेलापूर भागातील पाण्याचा वेळेत निचरा न झाल्याने संपूर्ण परिसर पाण्याखाली गेला होता. तर मागील वर्षी सानपाडा परिसरात देखील पाणी भरले होते. त्यामुळे अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत होऊ नये, यासाठी नवी मुंबई मनपाचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी शनिवारी सानपाडा, सेक्टर-११ व सेक्टर-२३, जुईनगर रेल्वे कारशेड या परिसरातील मान्सूनपूर्व सुरू असलेल्या नालेसफाईची पाहणी केली.



या वेळी नालेसफाईबाबत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना करीत या भागात पावसाचे पाणी साचून नागरिकांना त्रास होणार नाही, याची परिपूर्ण काळजी घ्यावी, असे सांगितले. दरम्यान, येथे होत असलेल्या नालेसफाईच्या कामांमुळे भविष्यात येथे पाणी तुंबण्याची समस्या निर्माण होणार नाही, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

सोबत दशरथ भगत यांनी स्वतः नालेसफाईच्या कामाच्या ठिकाणी भेट देऊन येथील कामाची पाहणी केल्याने नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

## खारघरमध्ये होम मिनिस्टर कार्यक्रम

### भाजप नेते बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त, महिला सक्षमीकरण, मनोरंजन आणि सन्मान यांचा सुंदर संगम ठरणारा न्यू होम मिनिस्टर हा विशेष कार्यक्रम पार खारघर येथे पार पडला. घर आणि समाज या दोन्ही आघाड्यांवर आपली जबाबदारी सक्षमपणे पार पाडणाऱ्या मातृशक्तीच्या सन्मानार्थ हा उपक्रम राबवण्यात आला.



या कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन बाळासाहेब पाटील यांना वाढदिसवाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गृहिणींना त्यांची नेतृत्वक्षमता, संवादकौशल्य आणि विनोदबुद्धी दाखवण्याची संधी मिळाली. या वेळी विशेष उपस्थितीत म्हणून सुप्रसिद्ध सिने-अभिनेत्री शिवानी सुर्वे, सुप्रसिद्ध सिने-अभिनेत्री मेघा धाडे, सुप्रसिद्ध सिने-अभिनेता क्रांती नाना माळेगावकर तसेच आमदार विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवीताई नाईक, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, महा मोर्चा अध्यक्षा साधना पवार, संयोजक समीर कदम मित्र परिवार, उदय पाटील मित्र परिवार, विक्रांत दादा पाटील प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी महिला वर्गाच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि सकारात्मक प्रतिसादाने कार्यक्रमात एक वेगळीच ऊर्जा संचारली.



उरण : श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासईचे सेवानिवृत्त शिक्षक व रयत सेवक संघाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक नुरा शेख यांच्या घरी जाऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील, भारतीय मजदूर संघाचे उपाध्यक्ष मधुकर पाटील व राजन घरत, जासई हायस्कूलचे माजी प्राचार्य अरुण घाग, संतोष ठाकरे, कामगार नेते जयवंत चौलकर आदी उपस्थित होते.



पनवेल : जीएस महानगर बँक परिवाराचे आधारस्तंभ, सहकारमहर्षी व बँकेचे संस्थापक अध्यक्ष कै. गुलाबराव सखाराम शेळके यांच्या ८३व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी सुखम हॉस्पिटल /एम.एस. लॉजिस्टिक्सचे मच्छिंद्र सुदाम जाधव, दौलत राऊत, आदिका नागावडे, सीमा आग्रे आदी उपस्थित होते.

## राज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवरायांना नमन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील हनुमान मंदिर परिसरात शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी हनुमान मंदिर अध्यक्ष अवधेश महतो, उदय पांडे, अवनीश सिंह, सागर रंधवे, ओंकार रंधवे, कपिल यादव आणि मीना भावसार यांचा प्रमुख सहभाग होता.

या कार्यक्रमाचे आयोजन उलवे रहिवासी संघटनेच्या वतीने करण्यात आले होते.

या वेळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिकांनी सहभाग घेत छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले व त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला.



## भ्रष्टाचार निर्मूलन समितीची आज बैठक

**नवी मुंबई :** भ्रष्टाचार निर्मूलन समितीची४ बैठक दिनांक १० जून २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात असून, ही बैठक कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात होणार आहे. बैठकीत विभागीय पातळीवरील प्रलंबित तक्रारींचा आढावा घेण्यात येणार आहे, अशी माहिती अपर आयुक्त वैजयंती इंदाणी-उंटवाल, यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.



पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या नवनियुक्त प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर यांचे कामगार नेते महेंद्र घरत यांनी अभिनंदन केले. या वेळी शशिकला पाटील, रवींद्र भोईर, बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, विशांत ठाकूर, शितलकुमार म्हात्रे, प्रशांत परदेशी, निलेश गोडे, चंद्रकांत मढवी आदी उपस्थित होते.

## पर्यावरण दिनानिमित्त कामोठ्यात वृक्षारोपण



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महानगरपालिका, प्रभाग समिती क, प्रभाग क्रमांक ११,१२,१३ रोजी कामोठे येथील सेक्टर ८ यूपीएससी सेंटर मागील मैदान येथे १०० झाडे लावण्यणचा उपक्रम राबविण्यात आला आहे.

कार्यक्रमाकरिता मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नंतर माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी हरित शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उपक्रमासाठी हेमलता गोवारी, पर्यावरणप्रेमी कर्पे सर, सुरेश खरात, शुभांगी खरात, रुपाली मोरे, रवी गोवारी, निलम आंधळे मॅडम, दामोदर चव्हाण, रंजना सडोलीकर, पनवेल महानगरपालिका इंजिनियर, प्रभाग समिती ब सर्व स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# पनवेलच्या फडके नाट्यगृहात ‘शिवआलिंगन’चे सादरीकरण

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील नाट्य कलाकारांमध्ये नाट्यगुण आहेत. ग्रामीण रंगभूमी ही समृद्ध रंगभूमी असून ती खऱ्या अर्थाने नटराजाची भूमी आहे, असे प्रतिपादन प्रख्यात ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांनी पनवेल येथे काढले. उरण तालुक्यातील गोवठणे येथील जय हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शहरी भागातील नाट्य रसिकांच्या मागणी नुसार शिव आलिंगन या शिवचरित्रावर आधारित, ऐतिहासिक नाट्यप्रयोगाचे आयोजन रविवारी ८ जून रोजी, सकाळी ११ वाजता करण्यात आले होते. या वेळी नाट्यप्रयोगाचे उद्घाटन ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून, करण्यात आले.



त्यावेळी यापुढे पांडुरंग पाटील यांनी साक्षात नटराजाच्या पाऊल खुणा उमटाव्यात इतका सुरेख व देखणा नाट्यप्रयोग वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सादर होत असतांना, मनाला एक वेगळाच आनंद मिळत असल्याच्या भावनाही त्यांनी या वेळी व्यक्त केल्या. या नाटकाचे लेखन शारदाकुमार शिर्सेकर यांचे तर प्रख्यात ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांनी आपले कसब वापरून नाटकातील पात्रे अक्षरशा: सजीव केली आहेत. राजू म्हात्रे यांचे प्रासंगिक संगीत तर उदय तांगडी - ठाणे यांची उठावदार रंगभूषा, अमृत म्हात्रे यांची वेशभूषा तर जितेंद्र म्हात्रे यांचे पार्श्वगायन होते.

नाटकातील, जिजामाता व बडी बेगम हेमांगी शैलेंद्र म्हात्रे, छत्रपती शिवाजी महाराज नरेंद्र वर्तक, अफजलखान कृष्णकांत म्हात्रे, नेताजी शैलेंद्र म्हात्रे, सय्यद बंडा निलेश म्हात्रे, पंताजी अशोक म्हात्रे, कृष्णाजीभास्कर प्रेम पाटील, कान्होजी जगन्नाथ वर्तक, खवासखान रूपम म्हात्रे, बहिर्जी आकाश पाटील, बाजी घोरपडे रोहन म्हात्रे, भावन्या विवेक वर्तक, प्रतापराव मोरे महेश पाटील, जीवा महाले अतिश वर्तक, संभाजी कावजी प्रदीप वर्तक, बिजली शितल अशोक म्हात्रे, मावळे संदेश म्हात्रे, साई म्हात्रे अरब सैन्य क्रिश म्हात्रे, सुरेश वर्तक व आर्य म्हात्रे आदी कलाकारांच्या नाटकातील प्रसंग व सादरीकरणातून अभिनयाची जुगलबंदी पाहायला मिळाली.

त्यामुळे नाटकाची जादू जरा वेगळीच राहिल्याची उत्स्फूर्त प्रतिक्रिया रसिकांमधून ऐकावयास मिळत होती. या वेळी व्यासपीठावर नाटककार हसुराम पाटील, रंगनायक मधुकर पाटील, रंगनायक रवींद्र पाटील, नाटककार धनेश्वर म्हात्रे, रंगनायक दत्तात्रेय घरत, सुरेश म्हात्रे, श्रीधर मोकल, लक्ष्मीकांत म्हात्रे, रामनाथ म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# वर्षा पर्यटनातील बळी रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी

## खालापुरात दरवर्षी पाचपेक्षा अधिक जणांचा मृत्यू



**खालापूर : प्रतिनिधी**

आला पावसाळा पर्यटक सांभाळा अशी अवस्था खालापूर तालुक्यातील प्रशासनाची होत असून काही ठिकाणी बंदी असताना सुद्धा बेधुंद तरुणाई मौजमजेच्या नादात हकनाक बळी जात आहे. मागील पाच वर्षात पंचवीस पेक्षा अधिक बळी खालापूर तालुक्यात गेले असून यामध्ये पोखरवाडी बंधारा धोकादायक असून कित्येक बळी या ठिकाणी गेले आहेत. याशिवाय चौक भागात नढाळ, सोंडेवाडी शिवाय खोपोलीतील झेनिथ धबधबा, माडप येथील धबधबा येथे दुर्घटना घडल्या आहेत.

पावसाळ्यात पर्यटकांची पसंती असलेल्या ईर्शाळगड दुर्घटनेनंतर पर्यटक कमी झाले असले तरी पर्याय म्हणून पर्यटाकांची पावले मोरबा धरण, भिलवले धरण तसेच अन्य धोकादायक ठिकाणी वळतात. पोखरवाडी बंधारा दरवर्षी पावसाळ्यात बळी घेत असून या ठिकाणी १४४ कलावंतर्गत बंदी घातली जाते. यंदा मात्र प्रशासनाकडून अद्याप आवश्यक ती खबरदारी घेण्यात आलेली नाही. झेनित धबधबा परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आल्या असल्या तरी प्रंचड पाऊस झाल्यानंतर धबधब्याच्या वाटेवरील ओढ्याला पूर येवून दुर्घटना घडल्या आहेत. शेकडोंच्या संख्येने येणाऱ्या पर्यटकाना आवर घालणे पोलीस प्रशासनाच्या आवाक्यात नसते.

पर्यटकांमुळे स्थानिकांना रोजगार मिळतो त्यामुळे वर्षा पर्यटनावर बंदी नको अशी मागणी देखील केली जाते, परंतु पर्यटकांना सोयी सुविधा आणि सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची याबाबत मात्र गांभीर्याने विचार होत नाही. तालुक्यातील ओढे, धरण तसेच धबधबे याबद्दल सखोल ज्ञान नसताना केवळ गुगल नकाशा वरून येणारे पर्यटक वाढले आहेत. गेल्या वर्षी माडप धबधबा ठिकाणी बंदी झुगारून आलेले बावीस पर्यटक अडकून बसल्यानंतर खालापूर पोलिसांनी गुडघाभर चिखलातून वाट काढत पर्यटकांची सुटका केली होती.

**सोंडेवाडी, पोखरवाडी तसेच नढाळ याठिकाणी वर्षा पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकानां सूचनेसाठी फलक लावले होते. शिवाय धरण परिसरात पाटबंधारे विभागाने सुरक्षा रक्षक तैनात केले होते. यासोबतच स्थानिक तरुणांना दुर्घटना घडल्यास तातडीने मदतीसाठी तयार ठेवण्यात आले होते.**
**–अनंता ठोंबरे, पोलीस पाटील, भिलवले, खालापूर**

**वर्षा पर्यटनात दुर्घटना घडू नये यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. गेल्या वर्षी धोकादायक ठिकाणी सुट्टीच्या दिवशी म्हणजेच शनिवार व रविवारी पोलीस कर्मचारी तैनात होते. या वर्षीदेखील शासनाने बंदी घातलेल्या ठिकाणी लक्ष असणार आहे.**
**–सचिन पवार, पोलीस निरीक्षक, खालापूर पोलीस ठाणे**

# प्लॅनेटेरियम आणि सौर ऊर्जा स्ट्रीट लाइट्स प्रकल्पांचे भूमिपूजन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



श्रीवर्धन शहराच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आज गाठण्यात आला आहे. शहरात ऑईल इंडिया लिमिटेड व भारत पेट्रोलियम लिमिटेड यांच्या सी.एस.आर. निधीतून साकार होणाऱ्या दोन महत्वाकांक्षी प्रकल्पांचे भूमिपूजन सायंकाळी खासदार सुनील तटकरे आणि महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले.

या वेळी उपस्थितांना संबोधित करताना खासदार सुनील तटकरे म्हणाले, श्रीवर्धन हे केवळ ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेले शहर नसून, आता हे शहर विज्ञान, पर्यावरण आणि पर्यटन यांचे केंद्र ठरणार आहे. सौर ऊर्जेवर आधारित प्रकाशयोजना आणि अत्याधुनिक प्लॅनेटेरियम हे श्रीवर्धनला आधुनिक महाराष्ट्राचे आदर्श शहर बनविण्याच्या दिशेने ठोस पावले आहेत.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी बोलताना सांगितले, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी उभारले जाणारे प्लॅनेटेरियम हे एक अभिनव पाऊल आहे. त्याचबरोबर, सौर ऊर्जेचा वापर करून उभारण्यात येणारी स्मार्ट स्ट्रीट लाइट प्रणाली ही पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन उपाययोजना आहे. या प्रकल्पांमुळे श्रीवर्धनमध्ये सौंदर्य, ऊर्जा कार्यक्षमता आणि नागरी सोयींमध्ये लक्षणीय वाढ होईल, याबाबत मला पूर्ण विश्वास आहे. १२.५ मीटर उंचीचे १२ हाय मास्ट लाइट्स – प्रत्येकी १९५ वॅट ०६ मीटर उंचीचे १५० डेकोरेटिव्ह पोल – प्रत्येकी ७५ वॅट लाईट्स आणि पोल्स सुशोभित व स्मार्ट तंत्रज्ञानाने सज्ज. एकूण २८ गुंठे जागा वाहन पार्किंग, तिकिट प्लाझा, अभ्यागत कक्ष ८ मीटर व्यासाचा डोम – ६० आसन क्षमता ४के एचडी प्रोजेक्टरसह ३६० अंश दृष्टीकोन दररोज ३० मिनिटांचे शैक्षणिक शो, भूमिपूजनाच्या या सोहळ्यास श्रीवर्धन नगरपरिषद मुख्याधिकारी विराज लबडे, मतदारसंघ अध्यक्ष मोहम्मद मेमन, तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, माजी नगराध्यक्ष सातनाक, अनंत गुरव आदी उपस्थित होते.

या प्रकल्पांमुळे श्रीवर्धन शहराचा चेहरामोहरा बदलणार असून, पर्यावरणीय समतोल राखून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारे हे शहर भविष्यातील पर्यटन, शिक्षण व विज्ञान याचे प्रमुख केंद्र होणार आहे, असा विश्वास या वेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.

# दुचाकीचालकांच्या सुरक्षिततेसाठी लायन ग्रुपतर्फे मोफत हेल्मेट वाटप

**चौक : प्रतिनिधी**

सद्या दुचाकी वाहन चालकांच्या आपघातात वाढ झाली असून, त्यांना सुरक्षा प्रदान आणि हेल्मेटचे महत्व कळण्यासाठी प्रवीण मालुसरे यांच्याकडून मोफत हेल्मेट वाटप लायन ग्रुपचे महाराष्ट्र राज्य प्रमुख बाळुशेठ फडके आणि संदीप मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.



प्रवीण मालुसरे हा आपला वाढदिवस सामाजिक उपक्रम राबऊन साजरा करतात. दुचाकी वाहन चालकांच्यात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. काही दुचाकीचालक जवळ जाऊन येत असल्याचे सांगून हेल्मेट घालत नाहीत, परिणामी अनेकांचे अपघात होऊन मृत्यू तर काहीजण आयुष्यभरासाठी अंथरुणावर पडून आहेत, मेंदूला मार लागणे, आणि त्याचा वैद्यकीय खर्च न परवडणारा आहे, म्हणूनच हेल्मेटचे महत्व कळण्यासाठी आपण मोफत हेल्मेट वाटप केले आहे असे लायन ग्रुपचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष बाळूशेठ फडके यांनी सांगितले.

या वेळी माजी सरपंच संदीप मुंढे, उपाध्यक्ष रवी शेळके, राजेश फडके, सुधीर मुंढे, संदीप बोराडे, संदीप गाताडे, सचिन दुर्गे, विष्णू देवघरे, गोरक्ष धुमाळ, संतोष पाटील, संदेश लहाने, संतोष महिंदरकर उस्थितीत होते.

# शेलूच्या गणेश मंदिरातील चोरी उघडकीस

## गावातीलच अल्पवयीन मुलाला पोलिसांनी घेतले ताब्यात

**नेरळ : प्रतिनिधी**

शेलू येथील श्री गणेश मंदिर चोरी प्रकरण उघडकीस आणण्यात नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांच्या शोध पथकाला यश आलेले आहे. या चोरी प्रकरणात पोलिसांनी गावातीलच अल्पवयीन तरुणाला ताब्यात घेतले आहे. चोरीला गेलेली मंदिरातील दान पेटीसह रोख रक्कम नेरळ पोलिसांनी हस्तगत केली असून अधिक तपास सुरू आहे.



९ एप्रिल सायंकाळी ७ वाजण्याचे सुमारास नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील शेलू येथील आर्या पॅराडाईज सोसायटीतील उघडया असलेल्या सार्वजनिक गणेश मंदिरामध्ये अज्ञात चोरट्यांने प्रवेश करुन मंदिरात असलेली स्टिलची दान पेटी फोडली होती. दान पेटीसह तीस हजारांची रोकड अज्ञात चोरट्यांनी लंपास केली असल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात देण्यात आली होती.

अखेर या चोरी प्रकरणात काही वर्षापूर्वी राहण्यास आलेल्या शेलू गावातील तरुणाचे नाव समोर आले. पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून ही चोरी उघडकीस आणली आहे. आरोपी तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले असता तो अल्पवयीन असल्याचे समोर आले आहे. या चोरी प्रकरणात पोलिसांनी दान पेटीसह यातील चिल्लर आणि पाचशे, शंभर, पन्नास आणि वीस रुपयांच्या नोटा जप्त केल्या आहेत.

# उपवास तपस्या करणाऱ्या जैन भगिनींची रथातून मिरवणूक



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील मीना योगेश सिसोदिया आणि मीनल मनीष श्रीश्रीमाळ या जैन भगिनींनी लोणावळा येथील अल्केश मोदी या धर्म स्थळामध्ये ४७ दिवस उपवासाची तपस्या पूर्ण केली त्यांना तपस्वीची मोक्षमाला घालून त्यांच्या उपवासाची सांगता करण्यात आली. त्यांचे आगमन कर्जतमध्ये होताच जैन बंधू भगिनींनी त्यांची वाजत गाजत रथातून मिरवणूक काढून जैन मंदिरात आणले. या वेळी जैन बांधव भगिनी उपस्थित होत्या.

लोणावळा येथील अल्केश मोदी धर्मस्थळामध्ये कर्जत मधील कपड्याचे व्यापारी योगेश ओसवाल यांच्या धर्मपत्नी मिना योगेश ओसवाल आणि डॉ. मनिष जैन यांच्या सौभाग्यवती मीनल मनिष जैन यांनी पू. मुनिराज श्री गणधररत्न विजयजी महाराज साहेब तसेच कर्जतच्या कुल दीपक मुनीश्री कल्परत्न विजयजी महाराज साहेब यांच्या शुभ आशीर्वादाने प्रथम उपधान तपाची आराधना निर्विघ्न पूर्ण करून मोक्षमाला परिधान केली. या तपास्येत ४७ दिवस साधू प्रमाणे जीवन जगावे लागते.

त्यांची तपस्या पूर्ण झाल्यावर त्यांचे कर्जतमध्ये आगमन झाले. या वेळी कर्जतकर जैन बंधू भगिनींनी त्यांची वाजत गाजत रथातून मिरवणूक काढून त्यांना जैन मंदिरात आणले. तेथे धार्मिक विधी झाल्यानंतर त्यांना सन्मानाने त्यांच्या निवासस्थानी नेण्यात आले.

या वेळी मोहन ओसवाल, साजन ओसवाल, जिनेश बाफना, किशोर जैन, रणजीत जैन, पंकज ओसवाल, दिनेश जैन, राजू ओसवाल, योगेश ओसवाल, मदन परमार, मनिष जैन, प्रणय ओसवाल, मंगल परमार, पारस जैन, पोपट ओसवाल, कोरस ओसवाल, मयूर ओसवाल आदींसह जैन भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पळसदरीजवळ रिक्षा अपघातात पाच जखमी



**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली–कर्जत मार्गावर तळवली,पळसदरी येथे रिक्षा अपघातात पाच जण जखमी झाले. डोंबिवली येथील हरड कुटुंब कार्ला येथील एकविरा देवीचे दर्शन करून डोंबिवली येथे परतत असताना चालकाचे स्टेरिंगवरील नियंत्रण सुटल्याने रिक्षा रोडच्या कडेला उतरली. यामध्ये रिक्षामधील प्रवासी अडकून पडल्याने स्थानिक युवकांनी प्रवाशांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले.

हि घटना रात्री ९ वा सुमारास घडली. रिक्षामध्ये दोन पुरुष, तीन महीला आणि दोन लहान मुले प्रवास करीत होते. नलीनी घरत, नयना समीर हरड, रंजना राजाराम हरड, समीर हरड, गणेश हरड (सर्व रा. सर्वरनगर, डोंबिवली पश्चिम) अशी आहेत.

# ‘सिटी ऑफ फ्लॉवर्स’तर्फे रोहा शहरात वृक्षदिंडी

**रोहे : प्रतिनिधी**



सिटी ऑफ फ्लॉवर्स संस्थेच्या वतीने रोहा शहराती राम मारुती चौक येथुन रवीवारी सायंकाळी वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीच्या सुरुवातीला हेमंत ओक यांनी उपस्थिताना शपथ दिली.पालखी घेत पारंपरिक खालुबाजा, लेझीम खेळत, हातात जनजागृतीचे फलक घेत वृक्षदिंडीला सुरुवात करण्यात आली. या वेळी वृक्षलागवड बाबत जनजागृती करीत व्यापाऱ्यांना तुळशीची रोपे वाटप करण्यात आले. रोहेकरांसह लहान मुले व महिलांची उपस्थित लक्षणीय होती.

वृक्षदिंडी रोहा शहरातील राम मारुती चौक,बाजारपेठ, तीन बत्ती नाका, रोहा एसटी स्टँड, रोहा नगर परिषद कार्यालय चौक, वीर सावरकर रोड ते पुन्हा राम मारुती चौक अशी काढण्यात आली.

या वृक्षदिंडीमध्ये माजी आ.अनिकेत तटकरे,सिटी ऑफ फ्लॉवर्स संस्थापक सुरेंद्र निंबाळकर, वृक्षदिंडी उत्सव समिती कार्याध्यक्ष उदय ओक, प्रतिनिधी विज्ञान खवरे, साहाय्यक समिर दळवी, वन विभागाचे अधिकारी राजेंद्र गायकवाड, माजी नगराध्यक्ष रत्नप्रभा काफरे, समीर शेडगे, माजी पंचायत समिती सभापती राजश्री पोकळे, प्रा.अतुल साळुंखे, गटनेते महेंद्र गुजर, उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, समीर सकपाळ, मयुर दिवेकर, आप्पा देशमुख, मानसी दाते, सरोजनी शिंदे, प्राजक्ता चव्हाण, भाऊसाहेब माने, रोशन चाफेकर, हेमंत ओक, अजित मोरे, सुखद राणे, निलेश शिर्के, हेमंत मोहीते, रवी चाळके, राजेश कापरे, राम नात्ती, स्वरांजली शिर्के, रिद्धी बोथरे, आदी सहभागी झाले होते.

**कॉंक्रीटच्या या जंगलात हिरवळ निर्माण करण्याचे काम आपण करीत आहेत. आपण लावलेली झाडे जगविण्याचे काम करीत आहेत. रोहा फुलांचे शहर म्हणुन नावारुपाला यावे अशी सर्वांची इच्छा आहे. कळत न कळत झाडांचे ऱ्हास होताना दिसत आहे. शहरातील प्रत्येक सोसायटी व बिल्डारांनी झाडे लावण्याची आवश्यकता आहे.**
**–अनिकेत तटकरे, माजी आमदार**

# रानभाज्यांना शहरी, ग्रामीण भागात मोठी मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळा आला की, पूर्वी खेड्यापाड्यातच नव्हे तर शहरातही रोजच्या जेवणात रानभाज्यांची रेलचेल असायची. गरीब कुटुंबे पावसाळाभर या रानभाज्यावरच बहुधा अवलंबून असत. मात्र ग्रामिण भागात वाढत्या बांधकामामुळे या रानभाज्या सध्या दुर्मिळ झाल्याचे चित्र असून, रानावनात दिसणाऱ्या रानभाज्याही जंगलाच्या र्हासामुळे आता दिसेनाशा झाल्या आहेत.



दरवर्षी पावसाचे आगमन होत असल्यामुळे जंगलात अनेक प्रकारच्या रानभाज्या निर्माण होत असतात. ह्या रानभाज्यांमुळे आदिवासी यांना काही प्रमाणात रोजगारही मिळत असतो. शिवाय निसर्गाच्या मुळाशी अनेक प्रकारच्या रानभाज्या सहज निर्माण होत असल्याने या रानाभाज्यांचे महत्त्व दैनंदिन जीवनात अजूनही घटले नाही. यामुळे बाजरात तसेच रहदारीच्या ठिकाणी रानभाज्या दिसू लागल्या आहेत.

प्रामुख्याने यामध्ये, शेवळा, आंबट बिंदुकली, कोळी, रानतेरि, लोथ, करडू, बोकर, कवळा, टाकला, भारंगी या भाज्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असल्यामुळे या भाज्यांना आयुर्वेदात चांगले महत्त्व आहे. यामुळे या रानभाज्या ग्रामीण तसेच शहरी भागात आवडीने खाल्ले जाते. रानभाज्या विकून घरचे भागवणे सोपे जाते तसेच दिवसाला दोनशे–तीनशे रुपये मिळत असल्याने घरातील खर्च भागविले जाते. अजून काही रानभाज्या येण्यांसाठी विलंब लागणार आहे, असे रानभाज्या विकत असलेल्या विक्रेत्यांनी सांगितले. प्रामुख्याने रानावनात जाऊन आदिवासी बांधव या भाज्या बाजरात विक्रीस आणतात त्यामुळे पावसाळी मोसमाप आदिवासी बांधवांना रोजगाराची चांगली संधी असते.

# आत्मनिर्भर भारतासाठी कौशल्य विकास विशेष उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जन शिक्षण संस्थान रायगड व सी.एस.आर जे.एन.पी.टी यांच्या आर्थिक सहकार्यातून बॅग मेकिंग व ब्युटी पार्लर व्यवसाय प्रशिक्षण उपक्रम सुरू करण्यात आले असून युवती चेतना शिबिरामध्ये आदिवासी बांधवांची फ्लॉवर मेकिंग हस्तकला कार्यशाळा यशस्वीरित्या झाली आहे. जिल्ह्यातील चार तालुक्यांमध्ये ही कार्यशाळा झाली.



संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, सी. एस. आर. जे. एन. पि. टी मुंबई प्रकल्पाचे अध्यक्ष उमेश वाघजी, सल्लागार सिद्धार्थ उघडेजी व व्यवस्थापन मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य सक्रिय पणे सुरू आहेत. या उपक्रमाचा भाग म्हणून ग्रामीण भागांमध्ये गरीब गरजू व दुर्बल घटकांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

सद्यस्थितीला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे व भाग्यश्री पुसाळकर यांच्या माध्यमातून व प्रशिक्षिका स्वप्नाली म्हात्रे, सोनिया पाटील, विप्राली पुसाळकर, वनिता म्हात्रे यांच्या विशेष प्रयत्नातून विविध तालुक्यांत सुरू करण्यात आलेले आहेत.

# इंग्लंडमध्ये टीम इंडियाचा सराव





**लंडन : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी लंडनमध्ये पोहचला आहे. इथं पोहचल्यावर भारतीय संघाने सराव सत्राचीही सुरुवात केली. बीसीसीआयने भारतीय संघाच्या सराव सत्राचा व्हिडीओ आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून शेअर केला आहे.

रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या निवृत्तीनंतर शुभमन गिलला भारताचा कसोटी कर्णधार बनवण्यात आले आहे, तर या दौऱ्यासाठी ऋषभ पंतची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. २० जूनपासून लीड्समध्ये सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघाने रविवारी लॉर्ड्सवर सरावास सुरुवात केली.

बीसीसीआयने सरावाचा व्हिडीओ शेअर केलाय त्यात भारतीय संघाचा नवा कर्णधार शुबमन गिलसह स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अन्य खेळाडू लंडन येथील लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर कसून सराव करताना दिसते. भारतीय खेळाडूंनी रनिंगसह फिल्डिंगचा सराव करण्यावर जोर दिला. इंग्लंडच्या मैदानात जसप्रीत बुमराह हा फक्त तीन सामने खेळणार आहे. त्याच्याशिवाय मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा आणि अर्शदीप सिंह यांच्यावर गोलंदाजीची प्रमुख मदार असेल.

तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी नावाच्या या मालिकेतील पहिली कसोटी २० जून रोजी लीड्समधील हेडिंग्ले येथे सुरू होणार आहे. त्यानंतर एजबॅस्टन (२ ते ६ जुलै), लॉर्ड्स (१०-१४ जुलै), ओल्ड ट्रॅफर्ड (२३-२७ जुलै) आणि द ओव्हल (४ ते ८ ऑगस्ट) येथे सामने होतील. ही मालिका २०२५-२७ आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा भाग मानली जाते.

### ऋषभ पंत जखमी

भारतीय क्रिकेट संघाने इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी तयारी सुरू केली आहे. पहिल्या सराव सत्रादरम्यान उपकर्णधार यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंतच्या हाताला दुखापत झाली, परंतु पंतची दुखापत गंभीर नव्हती, असे संघाच्या डॉक्टरांनी सांगितले.

# स्पेनला हरवून पोर्तुगाल नेशन्स लीगचा विजेता



**म्युनिक : वृत्तसंस्था**

जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या पेनल्टी शूटआउटमध्ये स्पेनला हरवून पोर्तुगालने नेशन्स लीगचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामना जिंकल्यानंतर क्रिस्टियानो रोनाल्डोला आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि तो मैदानावरच रडू लागला.

अलायन्झ अरेना येथे झालेल्या रोमांचक अंतिम सामन्यात पेनल्टी शूटआउटमध्ये युरो चॅम्पियन्सचा पराभव करून पोर्तुगालने दुसरे नेशन्स लीगचे विजेतेपद जिंकले. सामना अतिरिक्त वेळेपर्यंत २-२ असा असताना पोर्तुगालने पेनल्टी शूटआउटमध्ये सर्व पाच गोल करून स्पेनला ५-३ असे हरवले. रोनाल्डोने गोल करून पोर्तुगालला सामन्यात बरोबरी साधून दिली होती. त्यामुळे सामना अतिरिक्त वेळेत गेला.

स्पेन अंतिम फेरीत जिंकण्याचा प्रबळ दावेदार होता, पण पोर्तुगालने पेनल्टी शूटआउटमध्ये चांगली कामगिरी करत स्पेनला हरवले. अंतिम फेरीत रोनाल्डोचा गोल हा त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील १३८वा गोल होता. या गोलसह तो आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल करणारे खेळाडू लिओनेल मेस्सी आणि सुनील छेत्री यांच्यापेक्षा खूप पुढे गेला आहे.

### ...अन् रोनाल्डो रडू लागला

स्पेनला हरवून पोर्तुगाल नेशन्स लीग चॅम्पियन बनल्यानंतर क्रिस्टियानो रोनाल्डो मैदानावरच रडू लागला. तुम्हाला माहिती आहे मी किती वयाचा आहे. अर्थात, मी सुरुवातीपेक्षा शेवटाच्या जवळ आहे, पण मला प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यावा लागेल. जर मला गंभीर दुखापत झाली नाही, तर मी खेळत राहीन, असे रोनाल्डोने विजयानंतर माध्यमांना सांगितले.

# निवृत्तीबाबत क्लासेनचा धक्कादायक खुलासा



**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज हेनरिक क्लासेन याने गेल्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करून क्रिकेट जगताला धक्का दिला. वयाच्या ३३व्या वर्षी त्याने एवढा मोठा निर्णय कोणत्या कारणास्तव घेतला याची माहिती दिली नव्हती, पण त्याने आपल्या निवृत्तीच्या निर्णयाबाबत आता धक्कादायक खुलासा केला आहे.

क्लासेन म्हणाला की, मला देशासाठी क्रिकेट खेळण्यासोबतच जगभरातील मोठ्या टी-२० लीगमध्ये खेळायचे होते, मात्र क्रिकेट साउथ आफ्रिकासोबत करार होऊ शकला नाही तसेच प्रशिक्षणातही करण्यात आलेल्या बदलामुळे त्याला हा निर्णय घ्यावा लागला. क्लासेनला २०२७च्या क्रिकेट विश्वचषकापर्यंत दक्षिण आफ्रिकेकडून खेळण्याची इच्छा होती, पण रॉब वॉल्टर प्रशिक्षकपदावरून पायउतार झाले. दक्षिण आफ्रिका वन-डे संघासाठी शुक्री कॉनराड यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली. त्यामुळे क्लासेनच्या भविष्याबद्दल अनिश्चितता निर्माण झाली.

क्लासेन या वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दक्षिण आफ्रिका संघात होता, परंतु त्यानंतर क्रिकेट साउथ आफ्रिकाने त्याला केंद्रीय करारासाठी दुर्लक्षित केले. निवृत्तीच्या निर्णयाबद्दल बोलताना क्लासेनने खुलासा केला की, मी खरोखरच वाईट परिस्थितीत होतो. मला दक्षिण आफ्रिकेकडून खेळण्याचा आनंद मिळत नव्हता. मला बऱ्याच काळापासून असे वाटत होते, मला माझ्या कोणत्याही कामगिरीची आणि संघ जिंकतो की नाही याची खरोखर पर्वा नाही. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी मी रॉबसोबत बराच वेळ चर्चा केली. त्याला सांगितले की जे चालले आहे त्याबद्दल मला चांगले वाटत नाही. मला ते फारसे आवडत नव्हते.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर क्लासेनने त्याच्या कुटुंबासोबत वेळ व्यतित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आता मी सहा-सात महिने घरी राहू शकतो. माझ्या कुटुंबाला त्याची गरज आहे. चार वर्षे झाली आहेत आणि खूप प्रवास करावा लागला आहे. मला थोडी विश्रांती हवी आहे, असेही त्याने स्पष्ट केले आहे.

### जगभरातील लीगमध्ये खेळणार

क्लासेन याने २०१८मध्ये दक्षिण आफ्रिकेसाठी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने दक्षिण आफ्रिकेसाठी चार कसोटी, ६० एकदिवसीय आणि ५८ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. कसोटीत १०४ धावा, एकदिवसीय सामन्यात २१४१ धावा आणि टी-२०मध्ये १००० धावा त्याच्या नावावर आहेत. आता यापुढे जगभरातील टी-२० लीगमध्ये तो खेळताना दिसेल.

# महिला अंपायरवर अश्विन भडकला; रागाच्या भरात पॅडवर मारली बॅट

**चेन्नई : वृत्तसंस्था**

तामिळनाडू प्रीमियर लीग २०२५मध्ये आयड्रीम तिरुप्पुर तमिझान्स आणि डिंडीगुल ड्रॅगन्स यांच्यात रविवारी सामना खेळला गेला. या सामन्यात डिंडीगुल ड्रॅगन्सचा कर्णधार रविचंद्रन अश्विन महिला अंपायरवर भडकल्याचे पहायला मिळाले.

साई किशोरच्या चेंडूवर एलबीडब्ल्यू आऊट दिल्यानंतर अश्विन मैदानातील महिला अंपायरजवळ गेला आणि त्यांच्याशी वाद घालू लागला. त्यानंतर त्याने पॅव्हेलियनकडे जाताना स्वत: पॅडवर बॅट मारली. अश्विनचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

डिंडीगुल ड्रॅगन्सच्या डावातील पाचव्या षटकात साई किशोरच्या गोलंदाजीवर अश्विनने स्वीप मारण्याचा प्रयत्न केला, परंतु चेंडू त्याच्या पॅडला लागला. यानंतर साई किशोर अपील केले आणि अंपायरने आऊट दिले. चेंडू लेग-स्टंपच्या बाहेर असतानाही अंपायरने आऊट दिल्याने अश्विन नाराज झाला. त्याने अंपायरला पटवून देण्याचा प्रयत्न केला की, हा चेंडू लेग स्टंपच्या बाहेर पडला आहे, मात्र तरीही पंचांनी त्याच्याकडे लक्ष दिले नाही आणि त्या पुढे चालत गेल्या. यामुळे अश्विन भडकला आणि स्वत:च्या पॅटवर बॅट मारली.



# रोह्यातील संस्कार वारगुडेला बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक

**धाटाव : प्रतिनिधी**

काठमांडू (नेपाळ) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय एशियन मिक्स बॉक्सिंग चॅम्पियन २०२५च्या स्पर्धेत रोहा तालुक्यातील सुकेळी (खैरवाडी) येथील आदिवासी समाजातील नऊ वर्षीय संस्कार योगेश वारगुडे याने भारताला सुवर्णपदक जिंकून देत अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

ज्या ठिकाणी संस्कार वारगुडे राहतो त्या ठिकाणी या मुलाचे कौतुक व गौरव पीडब्युडी व साईनगर सोसायटी शिवाजीनगर रोहाच्या वतीने करण्यात आला तसेच सोसायटीचे अध्यक्ष किशोर पोळेकर यांनी कौतुकाची थाप दिली. या वेळी पदाधिकारी व रहिवासी उपस्थित होते. संस्कारला स्पर्धेसाठी ग्रॅण्ड मास्टर राकेश म्हसकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# भारतीय संघाच्या वेळापत्रकात बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ या वर्षी भारत दौऱ्यावर येणार आहेत. दरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या दौऱ्यांच्या वेळापत्रकात काही बदल केले आहेत.

टीम इंडिया आणि वेस्ट इंडिज यांच्यात ऑक्टोबरमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. त्यानंतर नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये द. आफ्रिकेविरुद्ध दोन कसोटी, तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामन्यांच्या मालिका खेळवल्या जातील.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना १० ऑक्टोबरपासून कोलकात्यातील ऐतिहासिक ईडन गार्डन्सवर खेळवला जाणार होता, पण सुधारित वेळापत्रकानुसार हा सामना आता नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळवला जाईल. त्यानंतर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना १४ नोव्हेंबरपासून नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळवला जाणार होता, मात्र आता तो कोलकात्यातील ईडन गार्डन्सवर शिफ्ट करण्यात आला आहे. उर्वरित सामन्यांच्या वेळापत्रकात कोणताही बदल झालेला नाही.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com